# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०१४ |
| वर्ष | : | पंधरावे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४४ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१३**

**गणपत्रिका क्रमांक : २०१**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पंधरावे / अंक ५ / मे २०१४

## संपादकीय

### जनता उपाशी नेते तुपाशी

१७ व्या लोकसभेच्या निवडणुकांचा निकाल काही लागो किंवा लागलेलाही असेल; परंतु आचारसंहिता, शिवराळ भाषा, मतदान याद्यांचा घोळ, मतदानाची टक्केवारी अशा अनेकनेक प्रश्नांसह या निवडणुकांच्या निमित्ताने प्रचार संभावर झालेला पंचतारांकित खर्च हा मुद्दा फार ठळक आहे. प्रश्नांची तीव्रता इतकी कमालीची वाढली आहे की, पन्नास-साठ टक्क्यांची लोकशाही ही लोकशाही असू शकते का, असा प्रश्न सामान्य माणसाला पडावा! निवडणूक आयोग(?) जी काही आचारसंहिता आखून देते, तो उपचाराचा भाग आहे. पक्ष आणि उमेदवार या संहितेचा कोणताही विचार करत नाहीत. धमक्या देणारे, दादागिरी करणारे उमेदवार कायमच मस्तीत असतात. त्यांनी अधिकृतरित्या मिळविलेल्या(?) हजार कोटींच्या न वाचता येणाऱ्या रकमांचा कैफ त्यांना चढलेला असतो. अधिकृतच्या विरोधी अनाधिकृत हा शब्द आहे. या अनाधिकृतपणे मिळवलेली म्हणजे, जाहीर न केलेली रक्कम किती असू शकेल त्याची कल्पना देव जाणे!

या प्रचार सभांवर होणारा खर्च पाहता मति गुंग होते. एकेका सभेचा खर्च दोन दोन कोटींच्यावर होतो. मते आपल्याला मिळावीत म्हणून लाखो रुपयांचे वाटप केल जाते. ही सर्व संपत्ती जाहीर असते का? कोणत्याही निवडणुकीत सामान्य जनतेचे भवितव्य उजळायला हवे. आमच्याकडे 'उमेदवाराचे भवितव्य(!)' या संबंधीच बोलबाला असतो. त्यांचे 'भविष्य टांगणीला' याची काळजी केली जाते. माजावर आलेला हत्ती व ही गुन्हेगारी प्रवृत्ती यांच्यात काही फरक आहे का? प्रचार सभामंध्ये माध्यमांतून दिसणारा झगमगाट, हार, तुरे, गर्दी जमवण्यासाठी झालेले प्रयत्न, या सर्वांचे आकडे हा मोठे चक्रव्यूह आहे. सद्सद् विवेक बुद्धी आणि लाज यांचे काहीही सोयरसुतक दिसत नाही. अर्थात याला असणारे अपवाद हे केवळ नियम सिद्ध करण्याकरता असतात.

स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय शुचिता आणि तत्त्वज्ञान हे आजच्या जागतिकीकरणाच्या संदर्भात तसेच राहील किंवा रहावे असे समजणे चुकीचे आहे. जागतिक राजकारणातील प्रवाहांचा देशातील परीस्थितीवर परिणाम होणारच. याचे प्रमाण हा मात्र आमच्या बौद्धिक दिवाळखोरीचे चिंतन करावे असा विषय आहे. एका आर्थिक सिद्धांताप्रमाणे समाजाची विभागणी 'आहे रे' व 'नाही रे' अशा दोन गटांत होते. यांतील दरी आणि दरीमधील अंतर कमी करण्याचे काम

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

मात्र 'शिकलेल्या' भारताचे आहे. गांधीजींच्या नैष्ठिक विचारांचे आधिष्ठान हा आमच्या वाटचालीचा पाया असायला हरकत नाही. दररोज शेतकरी आत्महत्या करतात, देवीच्या ठिकाणी असणारा भगिनीवर्ग जीव मुठीत धरून जगतो. बेकारी वणव्यासारखी वाढते आहे. हवामानाच्या प्रश्नांनी झोडपून निघालेला ६०% देश उपाशी झोपतो; हे चित्र एकीकडे ४०% या व अशा प्रश्नांची तीव्रता एकीकडे, तर याच जनतेसमोर शिवराळ भाषेचे चालू असणारे प्रचारांचे रतीब दुसरीकडे. या चित्राचे वर्णन 'जनता उपाशी आणि नेते तुपाशी' असे करणे अयोग्य ठरेल काय?

खरे तर विवेकानंद, जे. कृष्णमूर्ती अशा जीवन तत्त्वज्ञानाचे चिंतन करणाऱ्या तत्त्वज्ञांनी कलेले शिक्षणासंबंधीचे मंथन हे फक्त तत्त्वज्ञानाच्या पाठ्यपुस्तकांपुरते आणि उत्तरपत्रिकेत उमटवण्यापुरते शिल्लक राहिले आहे. त्यावर गहन विचार करून समाजशास्त्रज्ञांनी आजच्या सर्व समस्यांवर एकत्रितपणे उपाय शोधण्याची गरज आहे. शिक्षण म्हणजे नेमकं काय? याचा गंध नसणाऱ्या सुशिक्षितांच्या पिढ्या कोणत्या लोकशाहीची अपेक्षा करणार? लोकसंख्या अफाट वाढते आहे. जीवन शिक्षणाचे महत्त्वच कळत नाही. त्यातून भ्रष्टाचार आणि अनागोंदी व्यवस्थापन या परंपरांचा प्रभाव वाढतोच आहे. मग श्रीमंत वर्ग आणि गरीब वर्ग यांमधील अंतर दूर कसे होईल बरे?

सामाजिक वैचारिक औदासीन्य, मरगळ, ज्याला इतिहासाचा अभिमान म्हणावा, त्याचे गैर अभिमानात होणारे रूपांतरण, रक्तात मुरलेली धर्मजाती अशा विषयांची विषवल्ली यांतून आम्ही बाहेर कधी पडणार? सर्वांत मोठी लिखित घटना हा अभिमान वहात बसण्यापेक्षा घटनेचा पुनः विचार करण्याचे धाडस कधी निर्माण होणार? हे सर्व प्रश्न ६५ वर्षे तसेच आहेत हे मोठे दुर्दैव!

**प्रा. मोहन पाठक**

●●●



व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रासारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष पंधरावे / अंक ५ / मे २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. मोहन पाठक | |
| २) | पावलो फ्रेरेच्या कर्मभूमित दोन दिवस | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | सिंहगड | श्री. राजेश मंडलिक | ६ |
| ४) | ग्रंथालय कायदा – सुरुवातीच्या इतिहासातील काही टिपणे | प्रा. मोहन पाठक | ८ |
| ५) | ‘संत सासू’ | श्रीमती आशा भिडे | ११ |
| ६) | श्रीमत् भगवद् गीता – अध्याय सोळावा दैवी आणि आसुरी संपन्न विचार | कै. शं. बा. मठ | १५ |
| ७) | नर्मदा परिक्रमा भाग : ४ | श्री. अरविंद ओक | १८ |
| ८) | भारतीय संस्कृती–बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २३ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे. आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- विचारप्रवृत्त लेख आपण पाठवून दिशाला सहकार्य करू शकता. तसेच स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- **सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल** वा असे **एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे**. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगी मूल्य पाठवावे व ज्ञानप्रसाराच्या कामास हातभार लावावा.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता. जगभरातून अंकास प्रतिक्रिया मिळतात.


– संपादक

**कृपया वर्गणीदार व्हावे.**

# पावलो फ्रेरेच्या कर्मभूमित दोन दिवस

*ब्राझीलच्या नोव्हो हॅम्बुर्गो येथे गेल्यानंतर पावलो फ्रेरेच्या कर्मभूमीत लेखकाला फ्रेरेच्या चरित्राची प्रकर्षाने आठवण आली. त्या निमित्ताने – संपादक*


पावलो फ्रेरे (Paulo Freire) हे शिक्षण क्षेत्रात फारच मोठे नाव आहे. समाजाच्या तळागाळातील लोकांचे शिक्षण हे त्यांच्या जिविताचे धेयहोते. त्यासाठी त्यानी अनेक खस्ता खाल्ल्या, अनेक हालअपेष्टा सहन केल्या. १९२१ साली ब्राझीलच्या उत्तर पूर्व भागात त्यांचा जन्म झाला. १९३० ला जी जागतिक मन्दी आली तिचे चटके त्यांनी बालपणीच अनुभवले. ऊसाच्या शेतात काम करणाऱ्या मजूरांचे हाल त्यांनी जवळून पाहिले. तेव्हाच त्यांनी आपल्या कार्याची दिशा ठरविली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी मोर्चा ऊसाच्या मळ्याकडे वळविला. ऊसाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांना त्यांनी ४५ दिवसात लिहायला आणि वाचायला शिकविले. त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन त्यावेळच्या शासनाने अशा प्रकारचे काम करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले आणि विद्यापीठात कायम नोकरीची व्यवस्था केली. साधारणपणे दोन दशके सगळे सुरळीत चालले होते. १९६४ ला ब्राझीलमध्ये सशस्त्र क्रांती झाली. क्रांतीनंतर आलेल्या राजसत्तेला पावलो फ्रेरेचे काम मुळीच आवडले नाही. त्यांनी या महान शिक्षणतज्ञाला देशाबाहेर जाण्याची शिक्षा ठोठावली. १९६४ ते १९७९ असा पंधरा वर्षाचा काळ त्यानी मातृभूमीच्या बाहेर घालविला. या कालावधीत त्यांनी दोन महत्त्वाची पुस्तके लिहिली. त्यांतील एक आहे स्वातंत्र्यासाठी अध्यापन पद्धत (Pedagogy of the Freedom) आणि दुसरे आहे वंचितांसाठी अध्यापन पद्धत (Pedagogy of the Oppressed). त्यांची ही दोन्ही पुस्तके अल्पावधीतच जगभर प्रसिद्ध झाली. १९८० ला पावलो फ्रेरे मायदेशी परतले आणि अर्धवट राहिलेले काम पूर्ण करण्याच्या मागे लागले. जीवनाची पंच्याहत्तरी पूर्ण केल्यानंतर १९९७ मध्ये त्यांनी इहलोकाची यात्रा संपविली.




**पावलो फ्रेरेचे वृद्धापकाळातले चित्र**

१९७६ मध्ये मी होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात रुजू झालो. केंद्राच्या एका ग्रामीण प्रकल्पात सहभागी झाल्यावर स्वतंत्र असा संशोधन प्रकल्प घ्यायचे मी ठरविले. 'दुर्बल गटातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या' यावर मी संशोधन करावे असे केंद्राचे संचालक प्रा. वि. गो. कुलकर्णी यानी सुचविले. प्रा. कुलकर्णी यांचे वाचन फार दांडगे होते. विविध विषयांवरील पुस्तके ते वाचत असत. आपल्याप्रमाणेच आपल्या विद्यार्थ्यांनीदेखील वाचन करून आपले ज्ञान समृद्ध करावे अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी स्वतः पुस्तकांच्या दुकानात जाऊन वेगवेगळ्या विषयांची पुस्तके ते आणत असत. १९७८ ला जेव्हा ते पुस्तक खरेदीसाठी गेले, तेव्हा त्यांच्या हातात

पावलो फ्रेरे यांचे एक छोटेसे पुस्तक लागले. आधाशासारखे त्यांनी ते रात्रभर जागून पूर्ण वाचून काढले आणि दुसऱ्या दिवशी कार्यालयात आल्यावर माझ्या हातात ठेवले. अशा तऱ्हेने पावलो फ्रेरे यांचे वंचितासठी अध्यापन पद्धत (Pedagogy of the Oppressed) हे पुस्तक माझ्या पी. एचडी. अभ्यासाचे शिक्षण क्षेत्रातले पहिले पुस्तक ठरले.




**पावलो फ्रेरेची दोन प्रसिद्ध पुस्तके**

हे पुस्तक आहे लहानसेच. परंतु ते अतिशय बोजड अशा इंग्रजी भाषेत लिहिलेले आहे. नवनवीन संकल्पनांची यात भरमार आहे. त्यांचा एक सिद्धांत असा, की शिक्षित मंडळी आपल्या शिक्षणाच्या भरोशावर अशिक्षितांवर जुलूम करीत असतात. शिक्षणाने समानता साधली जाते हे म्हणणे, म्हणजे थोतांड आहे. शिक्षणाने समतेच्या ऐवजी असमताच जन्माला येते आणि तिचे पडसाद समाजावर पडतात. त्यांचा दुसरा सिद्धांत असा की, सध्याचे शिक्षण हे बंकेच्या व्यवहारासारखे असतात. आपल्याकडे थोडेसे पैसे असले की आपण ते बंकेत टाकतो. असे करून थोडे पैसे साठले की गरज पडल्यास आपण ते काढतो. आपले शिक्षणही असेच आहे. शिक्षकाने थोडे थोडे ज्ञान वर्षभर विद्यार्थ्यांना द्यायचे आणि त्यांनी ते वार्षिक परीक्षेच्या वेळेस आठवायचे, असेच आपल्या शिक्षणाचे सध्याचे स्वरूप आहे. त्यांचा तिसरा सिद्धांत असा की, शिकणाऱ्याने काय शिकावे हे तथाकथित शिक्षित विद्वान मंडळी ठरवितात, शिकणाऱ्याच्या गरजा काय आहेत, त्यांना काय हवे आहे याचा विचार केला जात नाही. त्यामुळे वंचिताना उपयुक्त असे शिक्षण मिळत नाही. वरील विचारसरणीवर आधारित वंचितासाठी एक वेगळी शिक्षण प्रणाली त्यानी विकसित केली. पावलो फ्रेरेच्या कार्याचा आणि विचारांचा माझ्या संशोधनावर आणि कार्यावर खूप प्रभाव पडला. त्यामुळेच संधी मिळताच मी पावलो फ्रेरेच्या कर्मभूमीला भेट द्यायचे ठरविले होते. त्यासाठी मला अनेक वर्षे वाट पहावी लागली.

२०१३ च्या ऑक्टोबर महिन्यात माझी अनेक वर्षांची इच्छा पूर्ण झाली. नोव्हो हॅम्बुर्गो (Novo Hamburgo) या गावात आयोजित करण्यात आलेल्या मोस्ट्राटेक विज्ञान तंत्रज्ञान जत्रेत (Mostratec, a science and technology fair) सहभागी होण्याच्या निमित्ताने आम्ही ब्राझीलला गेलो. स्पर्धेचे काम संपल्यानंतर साव पावलो (Sao Paulo) या शहरात मी थांबलो. १९८० ला देशात परत आल्यानंतर पावलो फ्रेरे यांनी याच शहरात आपले उर्वरित कार्य केले. साव पावलो विद्यापीठात ते काम करीत होते. त्यांच्या कार्याच्या गौरव करण्यासाठी ब्राझील सरकारने त्यांच्या नावाने एक संस्था उभारलेली आहे. या संस्थेला भेट देण्याची माझी खूप इच्छा होती. पण ती पूर्ण होऊ शकली नाही. पुढच्या भेटीत या संस्थेला भेट देण्याचे नक्की केले आहे. त्यानुसार तेथील प्राध्यापकांशी सम्पर्क देखील साधला आहे. पावलो फ्रेरेच्या संस्थेला जरी भेट देता आली नाही, तरी त्यांनी ज्या विद्यापीठात काम केले त्या विद्यापीठाला भेट देण्याची संधी मला मिळाली. माझ्या संशोधनावर आधारित व्याख्यान मी तिथे दिले. त्याचबरोबर, तिथल्या प्राध्यापकांशी आणि संशोधकांशी चर्चा करण्याची संधी मला मिळाली. पावलो फ्रेरे या शिक्षणतज्ज्ञाबद्दल येथे फार आदर आहे. माझ्या संशोधनावर त्यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला हे पाहून त्यांना मोठा आनंद झाला.



साव पावलो विद्यापीठात चर्चा करीत असताना



हॉटेलच्या खोलीतून घेतलेले शहराचे छायाचित्र

ब्राझील हा एक प्रगतीशील देश. मागील काही वर्षांत या देशाने नेत्रदीपक प्रगती केली आहे. साखर कारखान्यातील मळीपासून अल्कोहोल तयार करायचे आणि ते इंधन म्हणून वाहनात वापरायाचे या बाबतीत या देशाने चांगलीच आघाडी घेतली आहे. ब्राझीलची परिस्थिति भारतासारखीच आहे. साव पावलो शहरात प्रवेश करताच आर्थिक विषमता नजरेस पडते. बहुमजली इमारतीबरोबरोच लहान लहान झोपड्या आपल्याला पहायला मिळतात. महागड्या वातानुकुलित गाडीत बसून गाणी ऐकणाऱ्या श्रीमंत माणसाबरोबरच रस्त्यावर गाणी म्हणून पैसे मागणारे लोक तेथे आढळतात. महागड्या हॉटेलात ऐटीत जेवण घेण्याऱ्या लोकांबरोबर पर्यटकांकडे चहासाठी पैसे मागणारे लोक येथे आढळतात. ही विषमता दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी पावलो फ्रेरेच्या तत्वज्ञानाचा उपयोग करून घेणे महत्वाचे आहे. ही बाब केवळ ब्राझीललाच लागू आहे असे नव्हे तर, भारतालादेखील लागू आहे. दुर्बल गटातील विद्यार्थ्यांच्या गरजांचा विचार करून अभासक्रम तयार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा अभ्यास करून योग्य शैक्षणिक पद्धत विकसित करणे आवश्यक आहे. तेव्हाच शिक्षण आपल्याला समतेच्या वाटेने नेऊ शकेल. अन्यथा विषमतेच्या विषाचा प्रसार होतच राहील.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

## *निवडणूक : विचारार्थ काही नोंदी*

आपल्या देशात प्रत्येक जातीनं पक्ष स्थापन करायला सुरुवात केली आहे. सर्वांनाच अद्याप यश आलेलं नाही आणि समजा आलं, तर चार–पाच हजार पक्ष होतील. जातीचे, बिनजातीचे, विशिष्ट तत्त्वज्ञानाचे असे सगळे पक्ष एकत्र केल्यास त्यांची बेरीज दहाएक हजारात जाईल. 'पक्ष शेकडो–हजार; पण कुणीच नाही जबाबदार' अशी स्थिति होऊन बसेल!

**संकलित**

●●●

# सिंहगड

*दिशासाठी प्रथमच लिहिणारे श्री. राजेश मांडलिक हे मोठे उद्योगपती आहेत. अनेक देशांत त्यांच्या कंपनीच्या शाखा आहेत. 'दिशा' च्या विनंतीवरून अशी बरीच स्फुटे त्यांनी आम्हांला पाठवली आहेत – संपादक*

तसा मी हाडाचा ट्रेकर नाही. (तसे बघायला गेलो तर मी हाडाचा खेळाडू नाही, हाडाचा इंजिनिअर नाही किंवा हाडाचा वाचक नाही. माझे आणि हाडाचे नाते हे फक्त चघळण्यापुरतेच आहे!) म्हणजे, मला ट्रेकींगची आवड नाही असेही नाही, फक्त कुणीतरी पुकारा केला पाहिजे. कॉलेजमध्ये एक तर गोडबोल्यांचा राजेश फरफाटावायचा किंवा बी.ए. मेडीकलचा एक वल्ली ग्रूप होता ते तरी ओढून न्यायचे. (या ग्रूपमधील वल्ली आता पुण्यातील प्रथितयश डॉक्टर्स आहेत!) नाही म्हणायला, एक–दोन ट्रेक मी अरेंज केले आहेत पण ते तुरळक. बाकी आपली मजल पर्वती, चतुःश्रृंगी किंवा फार तर घरामागची रामटेकडी. हो, म्हणजे डी म्हणेपर्यंत जी टेकडी संपते ती.

या पार्श्वभूमीवर मी रविवारी सिंहगडावर जायचे ठरवले, तेव्हा माझे मलाच आश्‍चर्य वाटले. बाकी घरच्यांनी ''याला वेड लागले आहे'' असे म्हणून सोडून दिले. (या कारणास्तव मला दररोज कुठल्यातरी कामावर अर्पण केले जाते.)

सकाळी ६.३० वाजता पायथ्याला पोहोचले. एका छोट्या शेतजमिनीचे पे ॲन्ड पार्क मध्ये रूपांतर केले होते. शेतीच्या उत्पन्नापेक्षा पार्किंगमधून जास्त पैसे कमावता येतात, हे बघून आश्‍चर्य वाटले. (संजय सोनवणी सरांच्या लेखाची आठवण झाली.)

कारमधून उतरून खाली घसरलेली ३/४ जरा वरती ओढली (ही आपली स्टाईल आहे. कुठल्याही घाम गाळण्याच्या क्रिया करताना मी जरा अघळ पघळ कपडे घालतो. वजन आणि घेर कमी झाला आहे हे जाणवण्यासाठी ही फारच नामी क्लृप्ती आहे. मला माहीत आहे, तुमचे विचारचक्र कंसातील पहिल्या वाक्यावरच थबकले आहे आणि नाही ते विचार तुमच्या मनात येत आहेत. पण ते थांबवा आणि पुढे वाचा!) आणि सिंहगडावर आक्रमण केले.

थंडी असेल म्हणून टी शर्ट वर पुलओव्हर घातला होता. थोड्या वेळातच उकडायला लागले. म्हणून तो काढून हातात घेतला. थोड्या त्या पुलओव्हर चे वजन मला डाचायला लागले. स्वतःलाच किती बावळट आहोत आपण. (हे स्वगत दर दिवशी ४–५ वेळा कुठल्यातरी कारणास्तव होतेच!) कारमध्येच ठेवायला हवे होते.

एक गंमत आहे, कुठल्याही गडावर जाताना या येताना कुणीतरी असे भेटतेच किंवा काहीतरी असे होते की ते विसरता येत नाही, मग ते रायरेश्‍वरवरून येताना ''ओ ग माझा पांडुरंग, महाराजाना भेटून आला व्हाय चालत जाऊन'' म्हणणारी आणि नीलचा म्हणजे माझ्या धाकट्याचा गालगुच्चा घेणारी म्हातारी आजी असो, किंवा राजगडावर भूक लागल्यावर स्वतःच्या वाटेची भाकरी आणि वाशाट देणारी मावशी असो. त्या पुलओव्हरच्या वजनाचा विचार करत असतानाच मला समोर ''ती'' दिसली. साधारण ५५ वय, हिरवे नऊवारी पातळ, रापलेला रंग आणि डोक्यावर ३०–३५ लिटरचा पाण्याचा छोटा ड्रम आणि हातात एक कळशी. हळूहळू गड चढत होती. मला माझीच लाज वाटली. मी त्या माऊलीच्या मागेच होतो आणि तिची झोपडी आली. छोटे हॉटेल होते तिचे. मला आश्‍चर्य वाटले, तेथे एक तरणा बांड मुलगा काकडी

चिरत उभा होता. मला ते काही झेपलं नाही. म्हणजे ती त्याची आई असो वा नसो, ते चित्र विचित्रच होतं, हे खरं. ते पाणी तिने लिंबू सरबतासाठी आणले असावे.

चढण अर्ध्यावर आली होती. एक छोटा ग्रूप होता, साधारण तिशीतील असावेत सर्व. २-३ लेडीज आणि २-३ जंटलमेन. त्यातल्या एकीने एकाला विचारले, ''ही पाण्याची बाटली इथे फेकू का'' तो म्हणाला, ''फेक'' मला राहवले नाही. मी म्हणालो, ''प्रत्येक हॉटेलमध्ये आता कचरा गोळा करतात. तेथे टाका.'' तर ती तिशीतील तरुणी म्हणाली, ''बरं काका''. काका! सूचना दिल्याचा सूड ती असा उगवेल असं वाटले नव्हते. माझ्या छातीत सूक्ष्म कळ उठली. ती गड भरभर चढल्यामुळे आली अशी मी मनाची समजूत घालून निघालो.

चढाई जारी होती. ५५-५६ वयाच्या ५-६ जणांचा ग्रूप आला. सगळे बापे. त्यातला एक जण त्यांच्या वयाला न शोभेल अशा घाण भाषेत मोठ्याने बोलत होता, उगाचच हसायचे. बाकी लोकसुद्धा मनात इच्छा नसून साथ देत होते. मला त्यातील कृत्रिमपणा जाणवत होता. मला हसू आले. मनात आले, यांनी माझे कॉलेजमधले सुसंवाद ऐकले असते तर सोवळे घालून ''घालीन लोटांगण'' म्हटले असते. असो.

दीड तासाची रपेट करून मी वरती पोहोचलो. गडाच्या मागे जाऊन भरारा वारा खाल्ला, गड एकदम स्वच्छ दिसत होता. शासनाने आणि काही स्वयंसेवी संस्थांनी चांगले काम केल्याचे जाणवत होते. पोहे खाल्ले, २ ग्लास ताक प्यालो. पोहे आणि ताकाचे ९० रु. झाले आणि माझा मध्यमवर्गीय मराठीबाणा जागा झाला. तेवढ्यात एक्स्प्रेस हाय वे वर चहासाठी २० रु. मुकाट देण्याचा नतद्रष्टपणा आठवला आणि पाणी आणणारी ती स्त्री ही आठवली. गपगुमान पैसे दिले आणि खाली उतरायला निघालो.

मजल दर मजल करत कारपाशी येऊन पोहोचलो आणि गडाकडे पाहिले. बऱ्याच दिवसानंतर आलो होतो. अडीच वर्षापूर्वी ॲन्जोप्लास्टी झाल्यापासून हे उद्योग कमीच झाले होते. त्यामुळे मस्त वाटले आणि उगाचच घोषणा द्यावी वाटली ''डॉ. सुहास हरदास की जय'' ॲन्जोप्लास्टी शोधणाऱ्या ॲलोपॅथीचा विजय असो'' रुबी हॉलची आठवण आली. त्याचे बिलपण आठवले. रुबी हॉलचे बिल...आई गं...छातीत पुन्हा कळ आल्यासारखे का वाटतेय!

**श्री. राजेश मंडलिक**

एस्. नं.१५/१२. डी-४/८

जीकेडी उद्योग समूह

नांदेड व्हिलेज, पुणे -४०००४१

●●●

## *निवडणूक : विचारार्थ काही नोंदी*
## *१६१६ पक्ष*

गेल्या वीस वर्षांत निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या आणि मान्यतेच्या प्रतीक्षेत असलेल्या पक्षांची संख्या वाढत आहे. राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पक्ष ठरविण्यासाठी आयोगानं निश्चित केलेले निकष लक्षात घेता राष्ट्रीय पक्ष हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच आहेत. २०१४ च्या निवडणुकीचं औचित्य साधत २४ पक्षांनी मान्यता मिळावी यासाठी आयोगाकडे अर्ज केले. त्यांच्या मागणीवर आयोगाकडून विचार सुरू आहे.

सध्याचे पक्षनिहाय चित्र असे :

एकूण राजकीय पक्ष - १६१६
राष्ट्रीय पक्ष - ६
राज्य स्तरावरील पक्ष (प्रादेशिक) - ४७
मान्यता नसलेले पक्ष - १५६३

**- संकलित**

# ग्रंथालय कायदा - सुरुवातीच्या इतिहासातील काही टिपणे

*१ मे १९६० हा महाराष्ट्र राज्य निर्माण दिन. या दिवशी पाहिलेली स्वप्ने, योजना यांचे इतिहासात काय झाले. हा विषय वेगळा आहे. परंतु त्यामागील निदान काही विषयांचा इतिहास माहीत असावा - संपादक*

जनतेला स्वयंशिक्षण देण्यासाठी व जनतेची वाचनाची गरज पुरविण्यासाठी सार्वजनिक वाचनालयाची समाजात सातत्याने वाढ होणे आवश्यक असते. या सार्वजनिक ग्रंथालयांकरिता जो निधी लागतो; तो सतत उपलब्ध करून देणे, ग्रंथालयांचा कारभार व्यवस्थितरित्या चालविणे याकरिता काही नियम असणे आवश्यक ठरते. असे नियम व्यापक स्तरावर शासन संस्थेने करणे हे ग्रंथालय चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीने पोषक ठरते. कायदा कर्तव्ये आणि अधिकार या दोहोंवरही नियंत्रण ठेवू शकतो. डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी भारतात प्रथमत: या कायद्याची आवश्यकता प्रतिपादन केली ग्रंथालयासंबंधींचा पहिला कायदा १८४८ साली अमेरिकेत मंजूर करण्यात आला होता. सार्वजनिक ग्रंथालयांच्या संदर्भातील या कायद्याचा इतिहास पुढील प्रमाणे आहे.

ब्रिटीशांच्या कारकीर्दीत 'प्रेस अॅड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स' हा कायदा मंजूर झाल्यानंतर त्याचे दूरगामी असे परिणाम आधुनिक ग्रंथालयांवर झाले. महाराष्ट्रातील ग्रंथालय कायदा अस्तित्वात येण्यास जरी १९६७ हे साल उजाडले तरी कायद्याची पार्श्वभूमी त्याच्याही पूर्वीपासून तयार होत होती. भारतात १९३० ते १९३९ हा ग्रंथालय कायदा अस्तित्वात येण्याच्या दृष्टीने आरंभकाल मानला जातो. १९३० साली झालेल्या बनारस येथील अखिल भारतीय शिक्षण परिषदेत ग्रंथालय कायद्यावरील परिसंवादात डॉ. रंगनाथन यांनी भारतासाठी आदर्श ठरेल असे ग्रंथालय विधेयक मांडले होते. त्यांनी सुचविल्यानुसार हा कायदा सक्तीच्या स्वरूपात होता. शासनाने अनुदान उपलब्ध करुन द्यावे व स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रंथालय कर बसवावा अशा सूचनाही यात होत्या.

डॉ. रंगनाथन यांच्या या मसुद्याने प्रभावित होऊन बंगाल, मद्रास व महाराष्ट्रातही काही प्रयत्न त्या काळात झाले. १९३९ साली काँग्रेस मंत्रिमंडळाच्या कारकीर्दीत श्री. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. मध्यवर्ती व प्रादेशिक ग्रंथालये स्थापन करण्याच्या योजनेची शिफारस या समितीने केली होती. १९४० साली प्रसिद्ध झालेल्या या अहवालाची अमलबजावणी १९४७ सालानंतर झाली.

१९४२ साली अखिल भारतीय ग्रंथालय परिषदेच्या मुंबई अधिवेशनात डॉ. रंगनाथन यांनी ग्रथालय विधेयक मांडले. १९४४ साली असाच एक प्रयत्न व्ही. के. कृष्णस्वामीअय्यर यांनी केला. १९४६ साली डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालय कायद्याचा मसुदा शिक्षणमंत्री चेट्टियार यांच्या हवाली केला. परंतु ग्रंथालय क्षेत्रात काम करणारांना त्या काळी या कायद्याची निकड वाटली नाही. ग्रंथालय कर बसविण्याऐवजी काही अनुदाने वर्गणी ग्रथालयांना दिली तर काम भागू शकेल असा विचार तेव्हा होता.

१९४७ साली डॉ. रंगनाथन यांचे अविभाज्य मुंबई राज्यासाठी असणाऱ्या कायदाचे पुस्तक औंध पब्लिसिंग ट्रस्ट ने प्रकाशित केले . त्या दृष्टीने महाराष्ट्रातील ग्रंथालय कायदाचे श्रेय डां. रंगनाथन यांनाच दिले जाते.

१९४८ साल हे कायद्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. या वर्षी भारतातील पहिला ग्रंथालय कायदा डॉ. रंगनाथन

---

अंतःकरणाची अलिप्तता बुद्धीचे स्थैर्य या सोप्या गोष्टी नाहीत.

यांच्या मसुद्यानुसार मद्रास राज्यात संमत करण्यात आला. त्याची अंमलबजावणी १९५० साली झाली. पुढे १९५५ साली रंगनाथन व श्री. उजळंबर यांच्या प्रयत्नांनी हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा संमत झाला.

१९५७ साली भारत सरकारने के. पी. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयासाठी एक सल्लासमिती नेमली. या समितीच्या प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

१) भारत सरकारने मध्यवर्ती ग्रंथालय कायदा करावा.
२) प्रत्येक राज्याने आपल्या राज्यासाठी ग्रंथालय कायदा करावा.
३) स्थानिक संस्थांना उत्पन्न करावर सरचार्ज म्हणून ग्रंथालयकर बसविण्याचा अधिकार देण्यात यावा.
४) ग्रंथालय कराच्या तिप्पट रक्कम ग्रंथालय अनुदान म्हणून राज्य शासनाकडून मिळण्याची व्यवस्था व्हावी.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष आचार्य दादासाहेब दोंदे यांनी मांडलेले विधेयक १९५९ साली मंजूर केले गेले नाही. १९५६ मध्ये हैद्राबाद राज्याचे राज्य पुनर्रचना तत्त्वानुसार विभाजन झाले व १९६० साली आंध्रपदेश कायदा संमत झाला. १९६३ साली डॉ. सेन यांच्या समितीने शिक्षण मंत्रालयाला विधेयकाचा मसुदा सादर केला; यावर १९६४ साली पाटणा येथे परिषदेत चर्चाही झाली.

१९६५ साली म्हैसूर राज्य ग्रंथालय कायदा संमत झाला. याच वर्षी महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेत डॉ. रंगनाथन यांच्या हस्ते कायद्या संबंधातील Model public libraries Bill for Maharashtra हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. नंतर याच वर्षी रत्नागिरी येथे परिषदेच्या अधिवेशनात कायदा करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. परिणाम स्वरूप १९६७ मध्ये महाराष्ट्र शासनानेही ग्रंथालय कायदा संमत केला व १८६८ साली या कायद्याची अमंलबजावणी झाली.

**सार्वजनिक ग्रंथालय**

सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या 'जनतेकडून जनतेच्या पैशातून जनतेसाठीच जे चालविले जाते ते सार्वजनिक ग्रथालय होय' अशी केली जाते. डॉ. रंगनाथन यांनी सार्वजनिक ग्रंथालयाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) प्रत्येकाला स्वयंशिक्षणासाठी निरंतर सहकार्य करणे.
२) सर्वांना सर्व विषयांवरील अद्ययावत माहिती पुरविणे.
३) ग्रंथसंग्रह, ज्ञानसाहित्य यांचा नि:पक्ष व समतोल संग्रह करणे.
४) संशोधक, कामगार, सामान्य वाचक, विद्यार्थी यांना हवे असणारे ज्ञानसाहित्य संग्रहित करणे.
५) सर्वांना फावल्या वेळेचा उपयोग करण्याची संधी ही कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टीने ग्रंथालयीन उपक्रमांवर नियंत्रण असणे आवश्यक असते. हे नियंत्रण कायद्याचे असल्यास ग्रंथालय व्यवसाय सुलभ होवू शकतो. कायद्याची आवश्यकता या दृष्टीने आवश्यक असते.

१) ग्रंथालयसेवा ही खर्चिक असते. ग्रंथालयाचा खर्च हा एकदा करून भागणार नसतो तर ग्रंथालयाच्या स्थापनेपासून हा खर्च सतत चालू असतो. हा खर्च कोणाही एका व्यक्ती वा संस्थेच्या आवाक्यात येणे शक्य नाही. त्यामुळे या खर्चाची तरतूद शासनासारख्या कायम स्वरूपी व व्यापक संस्थेच्या माध्यमातून अनुदान स्वरूपाने करणे आवश्यक ठरते. अशा अनुदान अनुदानातून घ्यावयाच्या मदतीसाठी कायदा आवश्यक असतो.
२) ग्रंथालयसेवा विनामूल्य असावी. भारतासारख्या लोकशाही राज्यपद्धती असणाऱ्या देशात शिक्षण व ग्रंथालयसेवा जितकी विनामूल्य उपलब्ध करून

दिली जाईल तितक्या प्रमाणात साक्षरता प्रसारता शिक्षणाचे मान उंचवण्यास मदत होईल. या दृष्टीने ग्रंथालयीन अर्थव्यवस्था जितकी बळकट असेल तितकी उपकारक ठरते. अशी बळकटी येण्यासाठी कायद्याची आवश्यकता असते.

३) साखळी योजनेतून प्रमाणभूत ग्रंथालयसेवा देणे राज्य, जिल्हा, तालुका, गाव अशा विविध पातळ्यांवर ग्रंथालयसेवा तयार करण्यासाठी कायद्याचे पाठबळ आवश्यक ठरते.

४) व्यवस्थापनातील सुलभता साधण्यासाठी विविध पातळ्यांवरील ग्रंथालयांतून व्यवस्थापन कुशलतेने साधता यावे, निरनिराळ्या पातळ्यांवरील मंडळांत मतभेद होऊ नयेत, यासाठीही कायदा आवश्यक ठरतो.

५) जनता व शासनाचा प्रतिसाद मिळण्यासाठी ग्रंथालयांची स्थापना कायद्यानुसार झालेली असल्यास जनमानसात ग्रंथालयाबद्दल आस्था निर्माण होते. ग्रंथालय समित्यांवर निवडून आलेल्या प्रतिनिधींवर शासनाची देखरेख राहू शकते.

६) राजकीय धोके कमी होतील. नागरी जीवनातील अस्थिरता व आर्थिक व्यवहार, पक्षराजकारण यांवर कायद्यामुळे अंकुश ठेवता येतो. त्यामुळेही ग्रंथालयाच्या व्यवहारात कायदा आवश्यक ठरतो.

७) सेवेतील प्रमाणभूतात वाढण्यास पाठबळ मिळते. विविध प्रकारच्या वर्गांतील सार्वजनिक ग्रंथालयांची सेवेतील एकसूत्रता प्रमाणभूतता वाढण्यास कायदा असणे आवश्यक ठरते.

थोडक्यात, जनमानसात विश्वास निर्माण होऊन सेवेतील प्रमाणभूतता साधता यावी व ग्रंथालयांना असणारा सततचा निधी उपलब्ध व्हावा या दृष्टीने ग्रंथालय कायदा आवश्यक ठरतो.

**महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कायद्याची ठळक वैशिष्टचे -**

१) हा कायदा जनतेच्या चळवळीतून निर्माण झालेला असल्याने व अनेकांनी याकरिता कष्ट घेतलेले असल्याने या कायद्याचे स्वरूप सर्वस्वी शासनाधिष्ठित असे नाही.

२) मद्रास, म्हैसूर राज्यांप्रमाणे जनतेवर कर न बसवता या कायद्याने ग्रंथालय विकासाठी किमान २५ लक्ष रुपये निधी उभारला.

३) या कायद्यामुळे महाराष्ट्रतील पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातील ग्रंथालय पद्धतींत एकसूत्रीपणा आला.

४) ग्रंथालय संचालनाय हे स्वतंत्र खाते निर्माण झाले. असे स्वतंत्र्य खाते निर्माण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होय.

५) प्रत्येक जिल्हाच्या पातळीवर विकास योजनेसाठी जिल्हा ग्रंथालय समिती स्थापन करण्यात आली.

६) राज्यासाठी एक मध्यवर्ती ग्रंथालय व चार विभागीय शासकीय ग्रंथालये स्थापन करण्यात आली.

७) ग्रंथालयाच्या विकासासाठी स्वतंत्र अनुदान संहिता तयार करण्यात आली.

८) ग्रंथपालाचा दर्जा व वेतन श्रेणी कायद्याने मान्य केली गेली.

९) राज्य ग्रंथालय परिषदेत ग्रंथालय संघ व या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींना प्रतिनिधित्व मिळाले. ग्रंथालय संचालक पदी ग्रंथालय तज्ज्ञाची नेमणूक करण्यात आली.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मद्रास, आंध्र व म्हैसूर राज्यांच्या ग्रंथालय कायद्यातील त्रुटी महाराष्ट्र राज्याने दूर करावयाचा प्रयत्न केला आहे.

**प्रा. मोहन पाठक**
कार्यकारी संपादक
'दिशा' ठाणे

●●●

# 'संत सासू'

*कै. सुफलाबाई (नागपूर) या संत स्वभावाच्या सासूबाई व त्यांच्या सुनेतील नात्यांचा हा अनुबंध - संपादक*

शीर्षक वाचून दचकलात का? काहीतरी गडबड किंवा गफलत, चूक झाली असेल असं वाटतंय का? संत सखू होती. पण संत 'सासू' कशी असू शकेल? सासू म्हणजे दुष्ट, खाष्टच असली पाहिजे, ही आपली पूर्वापार चालत आलेली पक्की विचारधारा. त्यानुसार तशी झालेली समजूत आहे. ते बरोबरच आहे, चूक मुळीच नाही. संत सखूची सासूही अशीच खाष्ट दुष्ट होती. पण मी आज ज्या संत सासूचा विषय काढला आहे, ती अगदी एक वर्षापूर्वी होऊन गेली. त्यांचे नाव कै. सुफला मुरलीधर देशमुख. माझी बहीण सौ. अलका देशमुख ही आधुनिक काळातली संत सखू नि तिची ही संत सासू. खूप वर्षापासून 'सुफला' ह्या स्वतःच्या बंगल्यात नागपूरला गोकुळपेठेत राहणारी ही देशमुख फॅमिली. मागे तुळशी वृंदावन पुढे लॉन, बगीचा, गॅरेज वगैरे असलेला असा हा पूर्वीचा 'सुफला' बंगला.

धरमपेठेत असलेल्या श्री गजानन महाराज मंदिराच्या सर्वांच्या माऊली-आई असलेल्या सुफलाबाई. कापरे मामीचं गजानन महाराज मंदिर म्हणूनच ते पूर्वीपासून ओळखलं जातं. त्यांच्यावर येणाऱ्या भक्तांची श्रद्धा-भक्ती होती. आपली दुःख-सुखं मंदिरात येऊन कापरे मामींना सांगत. कोणाला नातू झाला, कोणाचं लग्न ठरलं, कोणाला परदेश गमनाची संधी मिळाली, कोणाला परीक्षेत उज्ज्वल यश मिळालं, कोणी मोठ्या आजारातून बरं झालं, कोणाच्या जीवावरचं संकट टळलं, की लोक पेढे घेऊन मंदिरात येवून कापरे मामींच्या पायावर लोटांगण घालत. आशीर्वाद मागत. त्या पायावर ठेवलेल्या कोणाच्या बाळाला अंगावर हात फिरवून आशीर्वाद देत. कपाळाला अंगारा लावत. भक्त भरून पावत. त्यांचे आशीर्वाद घेतले की जणू त्या ज्या गादीवर बसत ती गजानन महाराजांचीच गादी आहे; कापरे मामी प्रत्यक्ष गजानन महाराजच आहेत अशी भक्तांची श्रद्धा होती. कुठल्या कार्यात यश येत नसेल, कोणाला प्रदीर्घ आजारपण आलेलं असेल, कोर्ट कचेऱ्या कटकटी मागे लागल्या असतील किंवा दुसरी कुठली संसारिक दुःखे असतील, लग्न जमत नसेल, मूलं होत नसेल तर मंदिरात मामींच्या पायावर डोकं ठेवलं, त्यांचे आशीर्वाद घेतले की सर्वांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतातच अशी दृढ श्रद्धा होती. भक्तांनी कापरे मामी निवर्तल्यानंतर त्या गादीवर वर्षानुवर्षे मामींच्या व मंदिराच्या सेवेत असणाऱ्या सुफलाबाई देशमुख यांना त्या जागी मानलं होतं. भजन, पूजन, अर्चन वगैरे सेवा त्या नित्य नेमानं मंदिरात येऊन करीत असत. सर्व भक्तांच्या त्या सुफला आई होत्या. पूर्वी त्या शाळेत शिवणाच्या शिक्षिका होत्या. त्यांच्या घरी कोणीच रिकामे बसत नसत. त्यांचे पती नोकरीतू निवृत्त झाल्यावर पेपरचा व्यवसाय करीत.

माझ्या बहिणीचं, अलकाचं लग्न ठरलं नि आमचं देशमुख कुटुंबाशी नातं जुळलं. अलकाचे सासरे, भाऊ व सासुबाई अत्यंत हौशी, उत्साही, अतिथ्यशील, सर्वांशी आपलेपणाने वागणारे दाम्पत्य होते. दोन नणंदा व मोठ्या दीरांचे लग्न झालेले होते. धाकटीचे नंतर झाले. दीर भावांसारखे नि जाऊ, नणंदा बहिणीसारख्या होत्या. सासूबाईंचं प्रसन्न, शांत व्यक्तिमत्त्व, चेहऱ्यावर सदोदित विलसणारं निर्मळ हास्य, प्रेमळ, तसेच सात्त्विक डोळे,

सर्वांना घेऊन चालणारं करारी, भारदस्त, खंबीर, लाघवी व्यक्तिमत्त्व. त्यामुळे प्रथमदर्शनीच तिच्या सासूबाईंचा स्वभाव त्या न बोलताच आम्हांला कळला होता. मांडव परतणी करून आम्ही सर्व माहेरची माणसं जायला निघालो, तेव्हा पदराने डोळे पुसत आईला वडिलांना मिठी घालणारी नवी नवरी पाहून तिच्या सासूबाई चटकन पुढे झाल्या. त्यांच्या हृदयातही कालवाकालव झाली. आम्ही जायला निघालो होतो पण आमचाही पाय निघत नव्हता. तेवढ्यात, अलकाच्या सासूबाईच झटकन पुढे झाल्या, अलकाला जवळ घेऊन तिच्या डोक्यावरुन प्रेमाने हात फिरवत म्हणाल्या,''रडू नको बाळ, आता हेच तुझं घर आणि आई जवळच आहे तुझी गावातच. कधीही जात जा आईकडे'' अलकाने मग चटकन डोळे पुसले नि हसत निरोप दिला आम्हांला. आम्ही पण समाधानाने बाहेर पडलो; आईसारखी सासू मिळाली म्हणून.

ही अलकाची 'आई आहे का सासू?' असा प्रश्न लोकांना पडावा असा एक प्रसंग आठवतो मला. मी मुंबईला राहत होते. पण अलकाच्या पहिल्या बाळंतपणाच्यावेळी आईच्या मदतीला मी नागपूरला माझ्या छोट्या तीन वर्षांच्या मुलाला घेऊन आले होते. अलकाला दवाखान्यात पोचवून तिचे सासरे गावातच असल्यामुळे तिच्या घरी सासूबाईंना सांगायला मी नि माझा भाऊ गेलो तर सासूबाईंची कोण गडबड उडाली. त्यांनी चटकन गॅसवर कॉफीचं आधण ठेवलं. देवाचा अंगारा घेतला. 'पातळ बदलले', म्हणाल्या, 'तुम्ही व्हा पुढे मी नि अरविंद येतोच ही कॉफी थर्मासात घालून स्कूटरवरून'. नि आम्ही पोचत नाही तो पाठोपाठ त्या आल्याच. लगबगीनं आत येत प्रसववेदनेनं विव्हळणाऱ्या अलकाच्या अंगावरून मायेचा हात फिरवत त्यांनी पिशवीतून अंगारा काढत तिला लावला. माझी आई अलकाजवळच बसली होती. मुलीच्या प्रसववेदना बघून तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वहात होत्या. तिला काहीच सुचत नव्हतं. 'घाबरू नका. सर्व व्यवस्थित होईल. लवकर, सुखरूप सुटका होईल. आई व्हायचंय तर थोडा त्रास सहन करावाच लागणार, ना!'' त्या धीर देत आईला म्हणाल्या. त्यांचा हसतमुख, प्रसन्न चेहरा, प्रेमाचे दोन शब्द ऐकूनच आम्हांला सर्वांना धीर आला. प्रथम अलकाला स्वतःच्या हाताने थर्मासमधील कॉफी पाजून त्यांनी माझ्या आईला पण कॉफी प्यायला लावली. तुम्ही पण दमला आहात, शिवाय पुढे तुम्हांला अजून बसायचे आहे, सर्व करायचे आहे; तेव्हा ताकद हवी ना अंगात, म्हणून एवढी कॉफी प्याच उषाताई! म्हणून त्यांनी आग्रह केला. आईलाही मोडवला नाही. त्यावेळी दवाखान्यातल्या नर्सेसना प्रश्न पडला यातली मुलीची आई कोण?

अलकाचं नि सासूबाईचं चांगलं सख्य होतं. दोघी स्वयंपाक करता करता गप्पागोष्टी करीत. अलकाचे यजमान म्हणायचे, काय ग ! सारख्या खुसूखुसू बोलत असता सासवा सूना! अलका टेलिफोन एक्सचेंजमध्ये होती. तिला शिफ्ट ड्यूटी असायची तरी अलका स्वयंपाक उरकून घरातील जास्तीत जास्त काम पडायला नको म्हणून नि त्या पण तिला होता होईल ती मदत करायच्या. त्या शाळेतून किंवा मंदिरातून आल्याशिवाय कधी अलका जेवायची नाही; की अलका आल्याशिवाय त्या. नोकरीमुळे शक्यच नसेल तर गोष्ट वेगळी. आला गेला पै पाहुणा, नणंदांची, जावेची बाळंतपणं, कधी कोणाचं आजारपण सगळ्याला अलका नोकरी सांभाळून खंबीरपणे उभी असायची.

अगत्यशील, देशमुख कुटुंबामुळे अलकाकडे जायला अगदी रहायलासुद्धा आम्हांला कधी संकोच नाही वाटला. वास्तविक पाहता अलका सासुरवाशीण, एकत्र कुटुंब होतं त्यांच, तरीही! सासूबाई निवृत्त झाल्यावर मंदिरातच त्यांचा जास्तीत जास्त वेळ जायचा. घरच्या देवांची साग्रसंगीत पूजा त्याच करायच्या. घरात गणपती,

महालक्ष्म्या, गोकुळाष्टमीचं भजन वगैरे असायचं. त्यांची राहणी एकदम साधी. पाचवारी साधसं पातळ, केसाचं चक्र, मोठ कुंकू, नि पायात लगबग. सदा काहीतरी कामात, चेहऱ्यावर कायम प्रसन्न हास्य. अलकासुद्धा त्यांना साजेशी सून. सोज्ज्वळ, सात्त्विक, सुशील, सहनशील, विनम्र, सर्वांचं आदरातिथ्य गोड बोलून हसून करणारी. घर व्यवस्थित, नीटनेटकं ठेवणारी, काटकसरीनं, निगुतीनं संसार करणारी म्हणून तर म्हणावसं वाटत, संत सासू. आई नि मुलीसारखं त्यांच नातं. सासरे प्रेमळ पित्यासारखे, नणंदा तर बहिणीच जणू काही. अलकाचे मिस्टर डॉ. प्रा. अरविंद हे कॉमर्स कॉलेजात शिकवतात. शिकवण्या घेतात. तेही सर्वांत मिसळणारे, कामात मदत करणारे, नाट्याभिनय हा त्यांचा छंद. घरातले लोक मनमोकळेपणाने वागणारे, त्यामुळे वातावरण खेळीमेळीचे. सासूबाईंना सुनेचे कौतुक नि सुनेला सासूबाईंविषयी आदरभक्ती. मग कशाला नि कशी होतील सासुसूनांची भांडणं, नि वादावादी!

मी मुंबईहून माहेरी नागपूरला आईकडे आले की अलकाला तिच्या सासूबाई आवर्जून चार दिवस माहेरी पाठवत नि ताईला येताना इकडे घेऊन ये दोन दिवस म्हणून बजावत. पण सासूबाईंनी पाठवलं तरी अलकाचाच पाय माहेरी ठरत नसे. ''अगं, परवाच जरा त्यांची कंबर दुखत होती. एकट्याच कसं करतील सर्व? मी जाते आता घरी. ताई तूच चल माझ्याबरोबर आमच्या घरी'' दोन दिवसातच अलका घरी जायला निघते. इतकं सासूसुनेमधे प्रेम, आपुलकी सामंजस्य असल्यावर का नाही ते घर आनंदी राहणार! हसणार? का नाही त्या घरातल्या पुरुषाचं मनःस्वास्थ ठीक असणार?

सुफलाबाईंचं माहेर जळगावजवळ, रावेरचं मुजुमदारांकडचं. ११ एप्रिल २०१२ ला ९२ वर्षाच्या होऊन गेल्याच वर्षी अल्पशा आजारानं निधन झालं. त्या गेल्या तेव्हा सगळ्यात जास्त ढसाढसा रडली ती त्यांची सून अलका. आज इतकी वर्षे तिला त्यांची सवय झाली होती, लळा-प्रेम लागलं होतं. त्यांचा मोठा मायेचा आधार वाटत होता. तिला जेवण गेलं नाही. डोळ्याचं पाणी खळलं नाही. वयोमानाप्रमाणे त्या थकल्या होत्या. अलका त्यांच्या औषध पाण्याची, तब्येतीची काळजी जातीनं स्वतः घ्यायची. रात्री त्यांचे पाय, पाठ, कंबर चेपून घ्यायची. तशा अगदी शेवटपर्यंत त्या हिंडत्या फिरत्या होत्या. मंदिराचा नेम त्यांचा कधीच चुकत नसे. पूर्वी रोज जात, आता आठवड्यातून एकदा जायच्या. त्यांना, न्यायला-पोचवायला रिक्षा लावली होती.

त्या गेल्या, त्यावेळी मी ही गेले होते नागपूरला माझ्या भाऊ भावजयीबरोबर. माझ्याही डोळ्यांतून अश्रूधारा वाहत होत्या. माझी आई २००७ ला गेली नि ह्या २०१२ ला. आईचं नि त्यांच खूप जमायचं. माझ्या वडिलांना देशमुख परिवार 'देवमाणूस' मानत. त्यांच्या पायावर डोकं ठेवत. नि आम्ही अलकाच्या सासूबाईंना 'गजानन महाराजच' समजत होतो. माझ्या आईने १९७२ साली 'गीत गजानन' हे महाराजांच्या पोथीतील प्रसंगावर आधारित काव्य लिहिलंय. त्याचे नागपूरात खूप प्रयोग होतात अजूनही. 'गीत गजानन'च्या ग्रुपला अलकाच्या सासूबाईंनी तीनदा प्रयोग करायला नागपूरला बोलावलं. गजानन महाराज मंदिरात नि स्वतःच्या घरी आमची सर्व व्यवस्था केली. त्यावेळी माझा मुक्काम त्यांच्याकडेच होता. अलका कामावर जात होती. पण त्या माझी उत्तम बडदास्त ठेवायच्या. ३।।-४ वाजले की स्वतः चहा करून मला आणून द्यायच्या खोलीत. ''तू तुझी तयारी कर हं प्रवचनाची. आमच्याकडे कोणीही आलं तरी तू लक्ष देऊ नको. अलका, ताई आलीय तर पुरणपोळी कर तिच्या आवडीची एक दिवस. त्यांची मुलगीच माहेरी आलीय इतक्या प्रेमानं त्या हे कर ते कर सांगायच्या. दरवेळी लेक माहेरपणाला आली आहे समजून मला साडी चोळी देऊन पाठवणी करायच्या. अलकाची साडी वेगळीच असायची,

माझ्यासाठी. म्हणजे कोणतंही कार्य नसताना ४-५ साड्यांची मिळकत व्हायची माझी. माझ्या भावाला त्यांच्या हातची वांग्यांची भाजी खूप आवडायची. तर कधी तो आला की त्या स्वतः ती भाजी करून खाऊ घालायच्या. त्या रोज पहाटे ४ ते ६ जप नि ध्यान करायच्या. अगदी ह्या वयातसुद्धा. मंदिरातल्या किती बायकांची ऊठबस होती त्यांच्या घरी. आलेल्याला खाऊ पिऊ घालूनच पाठवायचं, हा त्यांचा शिरस्ता होता. अलका पण तिची ड्यूटी सांभाळून सर्वांचा आदर सत्कार करायची तत्परतेने.

अगदी शेवटी शेवटी चार सहा महिने त्यांना आंघोळ घालणे, कपडे नेसवणे, जेवण भरवणे सर्व अलकाच कराची. त्यांना अलकाच लागायची जवळ सर्व करायला. त्यामुळे त्या तिला कुठे जाऊ द्यायच्या नाहीत नि स्वतःही कुठे जायच्या नाहीत. अगदी मुलींकडेसुद्धा गावातल्या गावात. सगळे अलकानेचं शेवटपर्यंत मनापासून केलं. तीही निवृत्त होऊन आता तीन चार वर्षे झाली होती. आजी तर ती कधीच झाली होती. मुलींची लग्न झाली होती. मुलगा मार्गी लागला होता. सासूसासऱ्यांची सेवा, घरातले कुलाचार, आल्यागेल्या पै पाहुण्यांच आदरातिथ्य हाच अलकाचा परमार्थ होता.

इतके वर्षाचा सासूबाईंचा सहवास, त्यांनी दिलेलं आईचं प्रेम, त्यांचा मायेचा पाठीवरून फिरणारा हात, भक्कम आधार ह्या सगळ्यांचीच अलकाला एवढी सवय झाली होती, की त्या गेल्या तर तिला घर सुनं सुनं वाटायला लागलं. एक शून्य पोकळी, रितेपण जाणवू लागलं. त्यांची पावलोपावली आठवण यायला लागली. भास व्हायला लागले. इतकी ती सासुबाईंच्या सेवेत गुरफटून गेली होती. त्यांच्या सात्त्विक प्रेमळ अस्तित्वानं त्यांच घर भरलेलं असायचं. आता ते ओकं बोकं, रिकामं भासत होतं.

अशा त्या 'संत' कै. सुफलाबाई देशमुखांच्या २८ एप्रिल २०१३ च्या प्रथम स्मृतीदिनी त्याचं ह्या लेखातून केलेलं हे पुण्यस्मरण व त्यांना सादर वंदन. अशी 'सासू' असेल, तर कोण नाही म्हणणार 'मला सासू हवी'!

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
भ्रमणध्वनी - ९३२४०४४७६४

●●●

## *निवडणूक : विचारार्थ काही नोंदी*

- येन केन प्रकारे निवडणूक जिंकणे हा एकच निकष राजनीतीची जाण येण्यास पुरेसा आहे का? भारतात राजनीतीतज्ज्ञांची परंपरा असून सर्वांग परिपूर्ण राजनीतीवरील ग्रंथ आहे. कौटिल्याचे अर्थशास्त्र. त्याचा अभ्यास करायला हवा.
- निवडणुकीमधील भाषणे ही समाजमन प्रगल्भ करणारी असावीत, ही झाली अपेक्षा. पण सध्या आरोप-प्रत्यारोपांतून नुसतीच विखारी टीका होताना दिसत आहे. द्वेषपूर्ण भाषा हेच निवडणूकीतील प्रचारसभांचे वैशिष्ट्य झाले आहे. अशाने लोकशाही प्रगल्भ होईल?

**- संकलित**

●●●

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय सोळावा
# दैवी आणि आसुरी संपन्न विचार

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील १६ व्या अध्यायावरील हा लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. – संपादक*

**श्लोक १ ते ५ फळ सहित दैवी आणि आसुरी संपत्तीचे वर्णन**

श्रीकृष्ण म्हणतो – अभय, अंतःकरणाची शुद्धता, ज्ञान आणि योग मार्गात विशेष स्थिती दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, अर्थात आत्मविद्येचे अध्ययन, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, कर्मफळ, त्याग, शांती, चहाडी न करणे, भूतदया, अलोलुपता मृदुता, वाईट कर्मे करण्याची लाज, चंचलपणा नसणे, हे भारता तेजस्विता, क्षमा, धृति, पवित्रता, द्रोह न करणे, निरभिमानीपणा, ही लक्षणे दैवी संपत्ती घेऊन उत्पन्न झालेल्या मनुष्यात असतात.

हे अर्जुना, दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरपणा आणि अज्ञान हे दुर्गुण आसुरी संपत्तीने युक्त अशा मनुष्यात असतात.

हे पार्था, दैवीवृत्ती बंधनातून मुक्त करणारी व आसुरी वृत्ती बंधनात घालणारी आहे असे समज. हे पाण्डुपुत्रा तू दैवी संपत्तीसह निर्माण झाला आहेस; म्हणून दुःखी होवू नकोस.

**श्लोक ६ त २० आसुरी संपत्तीची लक्षणे व अधोगती**

हे अर्जुना, या लोकी दैवी आणि आसुरी अशी दोन प्रकारची सृष्टी उत्पन्न झाली आहे. प्रत्येकी दैवी सृष्टीचे वर्णन विस्ताराने सांगितले आहे. आता आसुरी सृष्टीचे वर्णन माझ्याकडून ऐक. आसुरी लोक प्रवृत्ती आणि निवृत्ती जाणत नाहीत. त्यांच्यात पवित्रता, सदाचार आणि सत्य असत नाही. हे जगत् असत्य आहे, निराधार आहे आणि येथे परमेश्वर म्हणून कोणी नाही. परस्पर संबंधातून येथे सर्व उत्पत्ती होत असल्याने विषय भोगाशिवाय याचा दुसरा हेतू नाही असेही ते म्हणतात. अशा प्रकारच्या दृष्टीचा अंगीकार करणारे, नष्टात्मा, मंदमती, भयानक कर्मे करणारे आणि सर्वांचे अहित करणारे, जगाचा विनाश करण्यासाठीच उत्पन्न झालेले असतात. केव्हाही तृप्त न होणाऱ्या, वासना धारण करणारे, मोहाने अनेक दुष्ट इच्छा धरून दुराचरण करणारे दंभी, मानी आणि मदांध लोक कर्म करावयास प्रवृत्त होतात.

कल्पांतीसुद्धा समाप्त न होणाऱ्या अपरमित अनंत चिंतांनी ग्रासलेले, कामभोगच श्रेष्ठ मानणारे कामभोगालाच सर्वोच्य समजणारे हे असतात. शेकडो अशापाशांनी बद्ध झालेले कामी आणि क्रोधी आपआपल्या उपभोगासाठी अन्यायानेच पुष्कळसा धन संचय करातत. आज मी अमूक मिळविले. उद्या तो मनोरथ सिद्ध करीन. यावेळी हे धन माझ्यापाशी आहे, उद्या ते माझ्यापाशी येईल, या शत्रूला मी ठार मारले, त्याचप्रमाणे इतर शत्रूनाही मी मारीन, मीच ईश्वर आहे, मीच भोगी आहे, मी सिद्ध आहे आणि मीच बलवान् व मीच सुखी आहे. मी श्रीमान आणि कुलीन आहे. माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ करीन, मी दान देईन आणि मीच मौज करेन. अशा प्रकारचे अज्ञानाने मोहित झालेले हे आसुरी लोक असतात. अनेक प्रकारे, भ्रांतचित्त झालेले मोहपाशांनी पछाडलेले, कामोपभोगात आसक्त होऊन हे लोक अपवित्र नरकात पडतात. आपल्याला मोठे समजणारे, धनमान मदाने मस्त झालेले हे आसुरी लोक ढोंगी माणसे आपले केवळ नाव व्हावे, म्हणूनच यज्ञ करतात. अहंकार, बल, घमेंड, काम, क्रोध यांचा आश्रय करून आपल्या व इतरांच्या देहात राहणाऱ्या ईश्वराचा द्वेष

करणारे हे लोक सदैव निंदाच करतात. हा नीच, द्वेषी, क्रूर व अमंगळ अशा नराधमाचा मी या आसुरी योनीत वारंवार घालतो. हे अर्जुना, अशा प्रकारे प्रत्येक जन्मात आसुरी योनीला प्राप्त होणारे हे आसुरी लोक मूढ होऊन मला प्राप्त न होता अधम गतीलाच जातात.

### श्लोक २१ त २४ शास्त्र विरुद्ध आचरणाचा त्याग शास्त्रानुसार आचरण आवश्यक

काम, क्रोध आणि लोभ अशी तीन प्रकारची आत्मशक्तीचा नाश करणारी नरकाची द्वारे आहेत. म्हणून त्यांचा त्याग केला पाहिजे. हे कुंती पुत्रा, या तीन तमोद्वारांतून विशेष रीतीने मुक्त झालेला मनुष्य आपल्या आत्म कल्याणासाठी योग्य आचरण करतो आणि म्हणून तो उत्तम गतीला प्राप्त होतो.

जो शास्त्र विधीचा त्याग करून वाटेल तसे आचरण करतो, त्याला सिद्धीही मिळत नाही, सुखही मिळत नाही आणि परमश्रेष्ठ गतीही प्राप्त होत नाही. म्हणून कर्तव्य अकर्तव्याचा निर्णय करावयास तुला शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे. शास्त्रात जे सांगितले आहे, ते जाणून कर्म करणे तुला या लोकी उचित आहे.

या अध्यायात मनुष्याच्या दोन वृत्तींचे वर्णन आले आहे. एक दैवी वृत्तीचे लोक आणि दुसरे राक्षसी अगर आसुरी वृत्तीचे लोक असतात.

**दैवी वृत्ती** – यांच्यात निर्ममता, पवित्रता, ज्ञानाची रुची, योगअभ्यास आवड, दान, इच्छा, इंद्रियदमन, आत्मसमर्पणाची भावना, श्रेष्ठ कर्म करताना आनंदाने कष्ट झोलण्याची प्रवृत्ती, सरळ स्वभाव, अहिंसा, सत्यपालन, अक्रोधिता, कर्मफलासक्तीचा अभाव, शांत स्वभाव, चहाडी न करणे, भूतदया, निर्लोभता, मनाची कोमलता, कुकर्म करण्यास न धजणे, मनाची स्थिरता, तेजस्विता, क्षमा, शौर्य, धैर्य, अद्रोहता घमेंड नसणे इत्यादी शुभ भाव या लोकांच्या ठिकाणी आढळतात.

हे सर्वच्या सर्व गुण प्रत्येकात असतातच असे मात्र नाही. तथापि, बऱ्याच प्रमाणात असू शकतात. हे गुण एकाकी रहात नाहीत. त्याच्याबरोबर दुसऱ्या गुणांचे साहचर्य असते. म्हणजेच एखादा गुण वाढल्याने दुसरे गुण आपोआपच येऊ लागतात. ही दैवी वृत्ती, यालाच संपत्ती म्हणतात, ती मानवतेच्या अत्युच्च कोटीचे लक्षण आहे. अति उच्च व अति उन्नत मनुष्य कोणता, याचे उत्तर हेच असू शकते, की ज्याच्या ठिकाणी हे दैवी गुण प्रकर्षाने राहतात तो मनुष्य उच्च होय. तोच श्रेष्ठ आणि तोच मानवतेचा पूर्ण विकास आहे. तोच मोक्षाचाही अधिकारी आहे. तो बंधनात अडकू शकत नाही अशी ही दैवी संपत्ती आहे.

**आसुरी वृत्ती** – या वृत्तीच्या लोकांत कर्तव्य अकर्तव्याचा विचार नसतो. अपवित्र व्यवहार, सदाचाराचा अभाव, सत्याचे पालन न करणे, ईश्वराला न मानणे, हे जगत् नियंत्यावाचून आहे असे समजणे, आपल्या उपयोगासाठीच हे आहे असे मानणे, आपले भोग वाढविण्यासाठी मोठे क्रूर कर्म करणे, जगाचा संहार करूनही आपले भोग वाढविणे, दंभ, मान, मद यांनी युक्त होऊन भोगात दंग असणे. मोहाने वाईटाला चांगले समजणे, अशुद्ध व्रताचे पालन करणे, कामोपभोग वाढविणे, कामी क्रोधी आशा पाशांनी बद्ध झालेले, कुकमी, क्रूरकर्मी आसुरी लोक भोग वाढविण्यासाठी अन्यायाने धन मिळवितात. यात हिंसा वा घातपात झाला तरी त्याला त्याबद्दल खंत वाटत नाही.

आज मिळविले उद्या पुनः मिळवीत लोकांचा पराभव करून लुटून द्रव्य आणीन ही माझी इच्छा आज सफल झाली, उद्या माझे मनोदय पूर्ण करीन. जो माझ्याशी वितुष्ट करील त्याना मारून टाकेन. मला भोग प्राप्त झाले पाहिजेत, एवढेच मी पाहीन. सर्व शत्रूंचा वध करीन, त्यांचे यथेच्छ उपभोग घेईन. माझ्यापुढे कोणाचा टिकाव लागणार नाही, माझ्यापाशी विद्येचे, धनाचे व माणसाचे खूप बळ आहे. मला कशाचीही पर्वा नाही. आड येणाऱ्यांची कत्तल करून जिंकलेल्या लोकांस जिवंत ठेवणे अगर ठार मारणे हे

चांगले मित्र आणि औषधे आपल्या आयुष्यातील वेदना दूर करण्याचे काम करतात.
फरक इतकाच की औषधांना एक्सपायरी डेट असते.

माझ्यावर अवलंबून आहे. कोणालाही पुढे येऊ देणार नाही. आम्ही मदत करू तरच वर येईल व आमची मारण्याची इच्छा असेल, तेव्हा तो मरेल. सर्व काही आमच्या मर्जीनुरूप होईल. आम्हीच भोग भोगणारे आहोत. इतरांना आम्ही विचारीत नाही. ते मरोत, रोगी होवोत, वाटेल ते होवो आम्हीच फक्त भोग भोगून सुखी होऊ.

दान आम्हीच देऊ, यज्ञ आम्हीच करू, आम्हांला हवे ते शिक्षण देवू. आम्ही सांगू तितकेच लोक बोलतील. आमच्या दयेवर त्यांचे जीवन अवलंबून राहील. अशाप्रकारे मोह जालात अडकलेले आसुरी लोक अनेक दुराचार, अनाचार व अत्याचार करतात आणि शास्त्रे इत्यादी गोष्टींची पर्वा करीत नाहीत. हे क्रूर, अधम, दुराचारी लोक प्रत्यही आपल्याच कर्माच्या बंधनात सापडतात. प्रगती, असे जे हे लोक समजतात तीच त्यांना बंधनांत अडकविते. अशा प्रकारे नित्य, आशा, चिंता इत्यादी जाळ्यात अडकून प्रतिदिवशी हीनतर आचरणाने निकृष्ट दशेला पोहोचतात. शेवटी खड्ड्यात पडतात. त्यातून त्यांना उठता येत नाही.

**सर्व आपत्तींचे मूळ** – यांच्यातील आचार विचार पाहिला असता, आसुरी लोकांच्या ठिकाणी काम, क्रोध व लोभ हे तीनच भाव प्रबळ असतात. दैवी संपत्तीत यांच्या विरुद्ध संयमितपणा, धर्मानुकूलता आढळते. हाच दैवी व आसुरी संपत्तीत भेद आहे. काम, क्रोध, लोभ यांनी आपल्या भोवताली केवढा स्वैराचार माजला आहे हे पहावे व यांचा संयम करणे किती आवश्यक आहे, याचा विचार व्हावा. हीच शास्त्र मर्यादा होय. म्हणूनच आपला कर्तव्य अकर्तव्याचा निर्णय शास्त्रानुसार निश्चित करून आपला आचार व्यवहार धर्मशास्त्रानुसार करणे हे प्रत्येक कल्याणेच्छूना आवश्यक आहे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

## महाराष्ट्र दिनानिमित्त!
### महाराष्ट्रातील आदिवासी जमाती

| अदिवासी जमाती | महाराष्ट्रातील जिल्हे | अदिवासी जमाती | महाराष्ट्रातील जिल्हे |
|---|---|---|---|
| १) गोंड, कोरकू, बंजारा | अकोला, अमरावती, औरंगाबाद, गडचिरोली | ९) लमाणी, कैकाडी, पारधी, वडार | बीड |
| २) महादेव कोळी, ठाकर, भिल्ल | अहमदनगर | १०) गोंड, भिल्ल, कोरकू | बुलढाणा |
| ३) परधान, राजगोंड जलबा, कवर, कोलम | गडचिरोली, चंद्रपूर | ११) गोंड, हलबा | भंडारा |
| ४) भिल्ल, पावरा, तडवी, गोंड | जळगाव | १२) गोंड, बंजारा, कोलम, आंधपरधान | यवतमाळ |
| ५) लमानी भिल्ल | जालना | १३) कातकरी, ठकार | रायगड |
| ६) भिल्ल, गावित, कोकणी, पावरा मावची धनका | धुळे | १४) वारली, कातकरी, ठकार, महादेव कोळी, हुबळा, धोडीय | ठाणे |
| ७) परधान | नांदेड | | |
| ८) कोळी, वारली, ठकार, भिल्ल, काथोडी | नाशिक, पुणे | | |

**संकलन – श्री. दीपक राऊत**
**मीरारोड, मुंबई**

नीती ही एक भौगोलिक बाब आहे. देशाची सीमा ओलांडली की बदलते! – व्यंकटेश माडगूळकर

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ५**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत– संपादक*

## दिवस १५ वा – प्रकाशा – तळोद – आश्रवा

मंदिर बंद नसूनही रात्री उकडत होते. परंतु पहाटे गार वाटले. सकाळी स्नान करून मंदिर सोडले. चौकात चहा घेऊन पुढे निघालो. दुतर्फा शेती/मोकळी जमीन. पुन्हा टणटणी आणि रुईची झाडे लागली. सुबाभळ तर सगळीकडे आहेच आहे. रस्त्याच्या कडेला वृक्ष, झाडे, झाडोरा काही नाही. ऊन हळू हळू चढू लागले. दुपार नंतर अवस्था गंभीर होणार हे जाणवू लागले. नऊ एक कि. मी. नंतर साखर कारखाना समोर धाबा/हॉटेल दिसले. तिथे फराळ केला आणि काय आश्चर्य, वासुदेव पाटील हजर! ते कामासाठी तळोद्याला जात होते आणि वाटेने आम्हांला शोधत होते.

पुढे रस्त्याच्या कडेने झाडे आहेत असे धीराचे शब्द बोलून ते निरोप घेऊन गेले. तत्पूर्वी त्यांनी घरून खास आमच्यासाठी आणलेले फिल्टर पाणी आम्हांला दिले.

पुढे खरोखरच सावली अधे मधे का होईना पण होती. अमलाड गावात वस्तीचे चैतन्य जाणवायला लागले. निर्मनुष्य, निर्वृक्ष आणि आजूबाजूला वस्ती नसलेल्या रस्त्याने जाणे एक शिक्षाच असते. मनुष्य वस्तीने लगेच चैतन्याचा संचार होतो. एकाकीपणा आणि रुक्षता लगेच नाहीशी होते, थकवा जातो.

## निरीक्षण

प्रकाशा सोडल्यापासून रस्त्याच्या दुतर्फा निलगिरीचे वृक्ष दिसत आहेत. ही झाडे बहुधा मुद्दाम लावलेली असावीत. सुल्तानपूरपासून चिंचेचे वृक्ष दाट छाया देत आहेत.

अमलाड गावात भोजनाची व्यवस्था पहावी का? (म्हणजे कुणालातरी पैसे देऊन खिचडी करण्यास सांगणे) असा प्रश्न मंगलने विचारला आणि पुढे पाहू असा विचार करून दहा पावले टाकली नसतील तोच मागून एक बाइक आली आणि तिथे भोजनाचे निमंत्रण दिले. इतरांचे ‘नाही, आता नको’ इत्यादी नकारात्मक विचार डावलून, अन्न ब्रह्मचा अव्हेर करायचा नाही या विचाराने आम्ही हो म्हटले.

सुदाम रघुनाथ पाटील/पटेल आणि बंधु नरेन्द भगवान यांचे ते प्रशस्त ओटीचे प्रशस्त घर होते. वैभव संपन्नतेचा उपयोग १९७४ सालापासून हे घराणे करीत आले आहे ते आजतागायत. दानाची दानत वंशपरंपरेने पुढे चालली आहे. पाच पन्नास, शंभर कितीही परिक्रमावासी येवोत, इथे त्यांना भोजन मिळेलच मिळेल. पुस्तक छापाल तर जरूर इथला पत्ता द्या, असे आवर्जून त्यांनी आम्हांला सांगितले. तीन भावांकडे मिळून २०० एकर जमीन आहे. ‘लक्ष्मी अनपगापिनीम’ आहे.

हे सारे वैभव तुमच्यासाठी मैय्याने आम्हांला दिले आहे. त्यातले थोडे तुमच्यासाठी वापरतो आणि उरलेले आम्ही वापरतो, असे ते बंधु सांगत होते. एकंदरित वैभव त्यांना शोभत होते. यांची बोलीभाषा गुजराथीशी नाते सांगत असली, तरी शिक्षणाचे माध्यम ‘मराठीच’ आहे.

वाटेत बोडस नावाच्या मंगलच्या नातेवाईकांकडे चहा घेतला, सरबरत बरोबर दिले आणि तळोद्यापुढील ५ कि.मी.वरील आश्रावा गावातील गणेश मंदिर संध्याकाळी ६.०० वाजता आम्ही गाठले.

गणेश मंदिर अतिशय सुंदर, स्वच्छ, प्रशस्त आणि नवे आहे. ते पहिल्यावर मी प्रेमातच पडलो व ठरविले की आजचा मुक्काम मंदिरातच करायचा.

इथे येईपर्यंत शक्ती राखून होतो. मंदिराच्या पायऱ्यांवरच सॅक उतरवून तिथेच बसलो व वासुदेव पाटलांना फोन केला.

मैय्याची पूजा सुरू असताना रमेश भाई विठ्ठल भाई हे वासुदेवरावांचे नातेवाईक आम्हांला भोजनप्रसादाचे निमंत्रण देण्यासाठी आले.

मैय्या देते त्या पानात रोज एक तरी गोड पदार्थ असतो, तसाच आजही होता!

मंदिरातील गणेशमूर्ती ही मुलांना फेकलेली चप्पल काढताना कचऱ्याच्या ढिगाखाली सापडली. त्यानंतर तिची पूजाअर्चा सुरु झाली व आत हे भव्य देखणे मंदिर इथे उभे राहिले आहे.

संध्याकाळाला सुरेल आवाजात देवासमोर दुतर्फा बसून भजने, श्लोक इ. कार्यक्रम थोडा वेळ झाले. त्यानंतर आम्ही भोजनास जाऊन आलो.

आश्रावा गावात स्वाध्याय आहे. (मंदिरासमोर रस्त्यापलिकडे दूध कलेक्शन केंद्र आहे. दूध पिण्यासाठी घेतले तर दुधाचे पैसे घेतले गेले नाहीत.)

**दिवस १६ वा : आश्रावा – कौली (२० कि.मी)**

सकाळी ६.४५ नंतर गाव सोडले. गेले दोन-तीन दिवस माझी सॅक धारण करण्याची क्षमता वाढत असल्याचे लक्षात येत आहे. तसेच संध्याकाळी पोहोचतो, तेव्हा थकवा कमी असतो किंवा नसतोच. उन्हाचा त्रास होतो परंतु सावलीत ५ मिनिटे सॅक काढून थांबले की पुन्हा नवी तरतरी येते.

तळोद्यापासून पुन्हा उत्तरेकडे सातपुड्याच्या अखंड रांगा अगदी १८०° पर्यंत दिसत आहेत. हवा वाईट असली की स्वच्छ दिसत नाहीत. परंतु आज दुपारनंतर अगदी ते पहाड अंगावर येतील की काय असे स्पष्ट दिसायला लागले. ज्या पर्वतरांगामधून आम्ही प्रवास केला. तीच पुन्हा पलिकडल्या तीरावर लागेल या विचाराने छाती दडपणे आहे.

दुर्दम्य अशा पर्वत रांगा पाहिल्या, की पलिकडे काय असेल हे जाणण्याची इच्छा होत नाही किंवा डोंगर ओलांडणाऱ्या वाटा असतील असे वाटत नाही; मग हजारो वर्षापूर्वी घनदाट अरण्यांच्या दुर्गम विंध्य पर्वतातून दक्षिणेकडे उतरायचा विचार तरी अगस्ति ऋषींच्या मनात कसा आला असेल? आपल्या शिष्यांसह, सांस्कृतिक कार्यासाठी हे लोकविलक्षण साहस करून विंध्य पर्वताचा माथा त्यांनी खरोखरच नमविला. अंकलेश्वर हमरस्त्याने सध्या मार्गक्रमण सुरू आहे. त्यापुढे चहापाणी, न्याहारी याची सोय आहे. साडेअकरा वाजता अक्कल्कुवा गाठण्यापूर्वी एका धाब्यावर आम्ही जेवलो. (१५८ रु.)



आजूबाजूला शेतमजूर ऊस तोडणीचे काम करताना दिसतात. तीन तीन टन ऊस बैलगाडीवर लादून साखर कारखान्यात जातो. आमच्या समोरच एक बैल भाराने पडला. त्यांना आपण किती क्रूर वागवितो हे पाहिले की स्वार्थान्धतचो राग येऊ लागतो.

साखर कारखान्यासमोर अशा शेकडो बैलगाड्या काल आम्ही पाहिल्या. कापूस नेणारे मालट्रकही माल

ठासून भरून नेतात, त्याची उंची व फुगवटा पाहिला की अपघाताची भीती जागी होते.



अक्कलकुवा मोठे गाव आहे. मुस्लिम प्रभाव जाणवला. बाजारपेठ मोठी आहे. गरम कपड्याची अनेक पाले पाहिली.

एका हॉटेल मालकाने मुलगा पाठवून बोलावून घेतले व भोजनाची विनंती केली. आमचे भोजन झाले होते. पुढे विश्रांतीसाठी पडवीच्या पायरीवर बसलो असताना मुन्नी परिहार नावाच्या गृहिणीने अगत्याने भोजन विचारले, पाणी दिले व काही नाही तर चहा घेऊन जा म्हणून चहा दिला.

वाटेत थांबून/थांबवून लोक पैसे देतात, पाया पडतात. जवळपास रोजच हे घडत आहे. हे असे पैसे आम्ही नाकारतो, फक्त एक रुपाया द्या असे सांगतो तरीही पैसे आले, तर ते सत्कार्यात देण्यासाठी हिशेबाने वेगळे ठेवतो.

नर्मदे हर! चा गजर तर एम.पी. भर सुरू होता. कुणी दिसत नाही आणि नर्मदे हर! चा पुकारा होतो. अगदी दुरून कुठून तरी दिसतही नाही अशा शेतातून कुणी मुलगी हाक देत असते. त्याला प्रतिसाद मिळेपर्यंत हे नर्मदे हर! चे गर्जन/गुंजन सुरू असते.

शाळेवरून जाताना एकाद्या कुणाचे लक्ष गेले की सर्व वर्ग खिडकीपाशी जमा होऊन 'नर्मदे हर!' चा पुकारा करत राहतो. जन्मापासूनच 'नर्मदे हर!' ऐकत ही मंडळी मोठी होतात त्यामुळे हा पुकारा म्हणजे त्यांच्या रक्तात भिनलेला संस्कार झाला आहे.

एम.पी. नंतर आता महाराष्ट्रात मात्र नर्मदे हर च्या जागी 'हर नर्मदे' असा पुकारा होतो.

खापर हे मोठे आणि पुढील टप्प्याचे गाव आवाक्यात नाही. त्यामुळे ५। ला ठरविलेल्या कौली गाव आल्यावर आम्ही रामदेवरा कुटीमध्ये मुक्काम ठोकला.

ही कुटी हमरस्त्यावर आहे. छोटीशी आहे. कुटीमागे पाण्याची टाकी आहे. दिव्याची सोय आहे. समोर आदिवासी घरे आहे. त्यांनी प्रेमाने स्वागत केले, उतरायचा परवानगी/संपती दिली व गरम गरम चहा पाठोपाठ, वरण भाताचे सुग्रास भोजन या उघड्या कुटीत आणून दिले.

**दिवस १७ वा : कौली – सागवारा / मुक्काम सागबारा, श्रीकृष्ण मंदिर**

सकाळी ६।। वाजता कौली सोडले, दोनच किलोमीटर अंतरावर पुढील (मोठे) गाव खापर होते. सकाळी कुटीमध्ये चहा घेतला होता. नंतर २/३ तास चहा दिसलाच नाही. शंकर गिरी आश्रमाची बाग पाहून तिथल्या पायरीवर बसून जवळ होते ते खाऊन क्षुधाशांती केली.(ब्रेकफास्ट) थोड्या वेळाने चहा मिळाला.

रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट आहे. कुठल्याही वाहनासाठी अयोग्य झालेला व खड्डेमय मार्ग महामार्गामध्ये मोडतो. ११।। वाजता गवाळीला होतो. तेथे लोकनाथ अमृतालयम हा स्वाध्यायाचा प्रयोग उभा आहे. २५ एक वर्षापूर्वी इथे म्हणे स्वाध्याय आला. आज गावात कुणी मांसाहार करीत नाही, कुणी दारू पीत नाही. विशेष म्हणजे हे गाव आदिवासी आहे.

मंदिराचा सभामंडप प्रशस्त आहे. सारवलेले आहे. पण आत विद्यापीठाप्रमाणे मूर्ती आहेत आणि बाहेर मोर,

हत्ती व सिंह म्हणजे महाकाली महालक्ष्मी महासरस्वती यांची प्रतीके आहेत.

परंतु लोकनाथ अमृतालयम म्हणजे गावाने एकत्र होऊन उभारलेले, नव्हे शाकारलेले मंदिर, ज्यात फक्त फोटो स्वरूपात प्रतिमा असतील. देवाचे घर असे हवे की जे दुरुस्ती मागेल, अशावेळी प्रेमाने ते शाकारणारे हात हवेत, मजबूत काँकरीट बांधकाम नको.

बांबूवर बांबू आडवा ठेवून जर ख्रिश्चनांचा क्रॉस तयार होऊन पूजा स्थल होते तर असलेही मंदिर साधे सुंदर बिनखर्चाचे असले पाहिजे. गावकरी सकाळी व संध्याकाळी निश्चितवेळी एकत्र येऊन प्रार्थना झाली पाहिजे. रोज एक वा अधिक दांपत्ये चोवीस तासासाठी पुजारी म्हणून उपस्थित असले पाहिजेत; अशी संकल्पना अमृतालयमची आहे. 'आज या गावात कुणी उपाशी झोपलेले नाही' अशी ग्वाही हे मंदिर देते.

गव्हाळी जवळच 'स्वागत' गावाच्या हॉटेलने पंचतारांकित भोजन दिले. येणाऱ्या परिक्रमावासीयांना हॉटेल मागील प्रांगणात स्नान, कपडे धुणे यासाठी व्यवस्था आहे. तर बगीच्यात जेवायची व्यवस्था आहे. अतिशय अदबीने पुरून उरेल इतके अन्न तिथे आणून देतात.

अजून पुढे निघालो आणि उन्हाचा तडाखा लागला. कानाच्या वरच्या भागात उलाघाल होऊ लागली. त्यातच बाजूला कुठे सावली नाही. काय करावे सुचेना. १५ मिनिटातच तेहतीस कोटी देव आठवायला लागले. नेटाने (की नाइलाजाने?) पुढे चाललो आणि पहिली सावली मिळताच सॅक टाकून खाली बसलो. दोन तीन वेळा असे करावे लागले. मात्र थोड्या वेळाने झाडांची संख्या वाढली आणि ३ नंतर उन्हही उताराला लागले. हलका वारा जाणवू लागला, तेव्हा माझी अवस्था चांगली झाली.

बडवानी नंतर आम्हांला मागूनही कुठे ताक मिळाले नव्हते. आज विचारले तर एका हॉटेलमध्ये ताक मिळाले. पैसे देत असूनही घेतले नाहीत. संध्याकाळी ४ वाजताच सागबारा हे गाव गाठले व श्रीकृष्ण मंदिर या सुन्दर ठिकाणी आसने लावली.

गुजराथ राज्याची सीमा सरू झाली आणि सुंदर, रुंद आणि उत्तम डांबरीकरण केलेले रस्ते सुरु झाले. दुतर्फा झाडीच्या दुहेरी रांगाही दिसल्या.

कालपर्यंत छाती दडपणाऱ्या पर्वतरांगा आता सौम्य वाटू लागल्या असून त्यातील भागाकडेच आमची मार्गक्रमणा सुरू आहे. डोंगर जवळ आल्यावर त्यावरील झाडे दिसू लागली आहेत आणि ते आता भयावह न वाटता मैत्रीपूर्ण वाटू लागले आहेत.

संध्याकाळी चहा न्याहारी केली, त्याचे पैसे नवीन भोजनासाठी ४० रु. मोजून आम्ही योगेश्वर भोजनालय ठरविले होते. तिथे जास्त नफा असे व न्याहारविला (लक्ष्मी विलास) म्हणत होता; परंतु आम्ही सौम्य नकार देऊन सशुल्क जेवायला गेलो.

रात्री आकाशातली नक्षत्रे फार छान दिसतात. दिवे (प्रकाश) प्रदूषण नसल्याने आकाश लाह्या फुटल्यासारखे दिसले. आता काठेय, उत्तर मकर वगैरे नक्षत्रे स्पष्ट दिसतात. कालेय आणि इतर नक्षत्रे शोधणे आता शक्य होईल.



मंदिराजवळ प्रामुख्याने मुस्लिम वस्ती आहे. ज्या

हिंदू आदिवासी राजाने हे मंदिर बांधले. तो मुस्लिम युवतीच्या प्रेमात पडून मुसलमान झाला व सर्व प्रजाही मुस्लिम झाली असे कळले.

**दिवस १८ वा : सागबारा –देडियापारा, मु. हनुमान (भीड भंजन) मंदिर**

सकाळी ६। ला सागबारा सोडले व अंधारातच वाटचाल सुरू केली. गेले दान दिवस आमची वाटचाल डोंगराकडे आहे हे कळत होते. आज लगेच घाट सुरू झाला व पुढील सहा तास घाटातच होतो. नंतरही घाट संपला तरी जंगल होतेच. आजची सर्व २३ कि.मी. वाटचाल भरपूर वृक्षराजी असलेल्या डोंगरामधून झाली. त्यामुळे उन्हाचा त्रासच झाला नाही. सकाळपासून हवाही छान थंड होती.

चोपडावाव गावाजवळ दुतर्फा असलेल्या एकूण १५/२० झाडांवर वटवाघळे लटकली होती आणि त्यांची कला सुरू होती. ती विशिष्ट झाडे सोडली तर पुढे एकाही झाडावर वाघळे नव्हती. आंब्याचे झाड कैऱ्यांनी लगडलेले असावे, तशी ही उंच झाडे वटवाघळांनी अक्षरशः लगडलेली होती.

रम्य वनश्रीने नटलेला हा भाग मात्र, पळस, औदुंबर, क्वचित आंबा आणि इतर खूप प्रकारच्या वृक्षांनी भरलेला आहे. गणेश वेलाची लाल चुटुक फुले अधे मधे आपल्या नाजूकपणाने लक्ष वेधून घेतात. कुठे कापसाची थोडी लागवड तर काही ठिकाणी (बहुधा) मका दिसला. उपलब्ध जागेत लागवड आहे.

बांबू संवर्धनाचा राष्ट्रीय प्रकल्प, घाटात दिसला. विशेष म्हणजे मैलन् मैल रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वनाला संरक्षक जाळ्या/तारा लावलेल्या होत्या. गंगापूर या गावात छान शाळा व छात्रावास आहे. हातपंप आणि वीज प्रत्येक गावात आहे.

घाटातून ट्रेकरवरून, मोठमोठे प्रोपेवर, बॉयलर यांची वाहतुक हळुहळू सुरू होती. या ट्रकचे ड्रायव्हर फारच कुशल असतात, याचा प्रत्यय घाटात येतो.

Tailor Bird आणि Sunbird (शक्करखोरा) विशेषतः शक्करखोरे खूप प्रमाणात आढळले. पळसाला मोहोर होता. त्या मोहोरामुळे हे पक्षी विपुल प्रमाणात आले असावेत.

दुपारी २ वाजता सदानंद बाबंची मेकळसुना नर्मदा कुटी लागली. तिथे खिचडी, कढी, रोटी असे तयार भोजन मिळाले. पुढील सर्व वाटचाल सावलीतून होती.

संध्याकाळी ५.०० वाजता देडियापाडा शहराच्या अलिकडील भागात भीड भंजन हनुमान मंदिरात पोहोचलो. मंदिराचे महंत श्री भगवानदासजी महाराज संसारी सद्गृहस्थ असून अत्यंत संयम व्यक्तिमत्व आहे. रात्री भात वरणाचा प्रसाद होता. एकूण १२ परिक्रमावासी मुक्कामी होते.



मंदिर छान आहे. आश्रम म्हणजे २५ मुलांचा छात्रावास आहे. महंत भोजन व निवासासह स्वखर्चाने या विद्यार्थ्यांना सांभाळतात व त्यांना हनुमान चालिसा इ. संस्कार स्तोत्रे शिकवितात.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचार परिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख – संपादक*

## प्रास्ताविक


भारतात इ. स. २०१४ हे वर्ष राजकीय, सामाजिक, आर्थिक समाजघडीमध्ये विलक्षण खळबळीचे वर्ष म्हणून जाणले जाईल!! कारण, तथाकथित 'राजकीय परिवर्तन' हे सुद्धा तथाकथित 'लोकशाही' व संविधान तत्त्वांवर आधारलेल्या निवडणूक प्रक्रियेवर आधारित होण्याचे ठरले आहे. 'परिवर्तनाची ही भौतिकवादी संकल्पना ही 'शाश्वत वैश्विक तत्वांवर' व 'आत्मतत्वांवर' आधारलेली नाही!

या प्रक्रियेच्या उंबरठ्यावर समाजातले अनेक संघर्ष अडचणी, प्रवृत्ती, स्वार्थ, व्यवस्था यांमधले दबलेले अंतर्गत दोष पृष्ठभागावर उसळून येत आहेत! सर्वच राजकीय नेते 'प्रगती परिवर्तन' ह्या शब्दांचा ओझरता उल्लेख करताना दिसताहेत! तेव्हा कोणते व कुठले 'परिवर्तन' त्यांना हवे आहे? कोण व कसे घडवून आणणार आहे? त्या बदलाला कुणाचे नेतृत्व लाभणार आहे? त्या नेतृत्वाचे ज्ञान व धारणा कोणत्या आहेत?

## सत्य परिवर्तन

आपल्या लेखमालेच्या संदर्भात हे 'परिवर्तन' केवळ 'भौतिक वादाच्या' ज्ञानावर व साधनांवर होणार असेल, तर ते दिखाऊ व उथळ, न टिकणारे असेल व त्यामुळे ते 'Human Consciousness' च्या आध्यात्मिक दर्शनाच्या ज्ञानावर "Integral Spiritualism" त्या संकल्पनेवर बरहुकूम होणारे नसेल! हे परिवर्तन खरोखर 'आत्मस्वरूप' असावयाला हवे. व ते जीवात्म्याचे तसेच सगळ्या समाजाचे, राष्ट्राचे 'आत्मस्वरूप परिवर्तन' असावयाला हवे. या पृथ्वीवरील आपल्या भारत देशातसुद्धा हे समाज परिवर्तन स्थिर व युगायुगांत टिकणारे असावयाला हवे. तेव्हा, या विषयावर पुष्कळ लिखाण झाले व उपलब्ध झाले आहे ते केवळ 'शब्दस्वरूप' म्हणजे 'Academic' पद्धतीचे मिळेल! पण वास्तविक ते 'साधना स्वरूप' माध्यमातून व्यवहारात व समाजात व राष्ट्रात दृढ व्हावयाला लागेल, तरच टिकाऊ, कायम व स्थिर स्वरुपाचे असू शकेल. मग त्याचे 'योगिक क्रियांच्या' संदर्भात काय वर्णत आहे. आपण भौतिक व्यवहारात जे 'आत्मज्ञान', 'आत्मदर्शन', 'आत्मबोध', 'आत्मसंस्कार' असे शब्द वरवर वापरतो; त्याचे प्रत्यक्ष गूढ, आगम शास्त्रात 'क्रियारूप' वास्तव कसे आहे? 'आत्मपरिवर्तन' हे 'योगिक शास्त्रावर' आधारलेले असते, कारण त्या साधना वैश्विक शाश्वत तत्त्वांवर आधारलेल्या असतात.

या संबंधी 'पतंजल योगदर्शन' मध्ये जे भाष्य प्राप्त आहे, ते अत्यंत सारांश रूपाने प्रथम पाहू या.



'परिवर्तन' होण्यासाठी बुद्धीचा वापर आवश्यक असतो. पण बुद्धी ही त्रिगुणात्मक (सत्त्व, रज, तम) आहे. 'बुद्धी' व 'पुरूष' यांत फरक आहे.

''पुरुष को ''दर्शित विषयत्वात'' अर्थात बुद्धिद्वारा दिखाए गए विषयों को देखनेवाला कहा है!''

या ठिकाणी बुद्धीची 'परार्थरूपता' बघितली जाते!! 'शाब्दिक ज्ञान' 'प्रत्यक्ष Objective Reality उन्नति' (Realistic, Objective Conversion) घडवून आणू शकत नाही. '' जब तक योगी बुद्धी की इस 'परार्थरूपता' को जानकर भी पुरुष की स्वार्थरूपता को नही जानता, तब तक वह पुरुष ज्ञान से दूर रहता है।''

इथे 'व्यक्ती' (Individual) व 'पुरुष' (Human form) (पुरुष सूक्ताचा संदर्भ) यामध्ये फरक आहे. तो जाणणे आवश्यक आहे. 'जीवात्मा-पुरुष' **स्वसंवेद्य,** म्हणजे ''अपने से ही जानने योग्य होता है, अन्य से नही देखा जा सकता।''

थोडे से पुढे जाऊन या क्रिया कोणती शक्ती व ज्ञान प्राप्त करून देतात ते पाहू या.

**''स्वार्थ संयम से हुए 'पुरुष ज्ञान' हे उपलब्ध योगी को प्रतीक, श्रवण, वेदना, आदर्श, आस्वाद और वार्ता नामक सिद्धियाँ प्राप्त होती है।''**

१. **प्रतीक** – चित्ताची सूक्ष्म ज्ञान धारणा लाभते.

२. **श्रवण** – श्रवणेंद्रियांना सूक्ष्म शब्द ऐकण्याचे सामर्थ्य लाभते.

३. **वेदना** – स्पर्शेंद्रियांना सूक्ष्म अनुभूती सामर्थ्य मिळते.

४. **आदर्श** – नेत्रेंद्रियांना सूक्ष्म रूप ग्रहणशक्ती मिळते.

५. **आस्वाद** – रसनेंद्रियांना सूक्ष्म 'रस' ज्ञान प्राप्त होते.

६. **वार्ता** – घ्राणेंद्रियांना सूक्ष्म गंध जाणणे, ही शक्ती लाभते.

थोडक्यात, शरीर ह्या 'श्रीयंत्राला' ज्या इंद्रियांची स्वाभाविक व नैसर्गिक जन्मामुळे प्राप्ती होते, त्यांच्या सहाय्याने व त्यांच्या नैसर्गिक क्षमतेमध्ये परावर्तन वा शक्ती परावर्तन सामर्थ्य प्राप्त होऊन, ज्याला आपण 'इंद्रियातीत' (दर्शन व शक्ती) अवस्था म्हणू ती अवस्था प्राप्त होते.

या योगिक परिवर्तनानंतर 'परवैराग्य' व 'विवेकख्याति' प्राप्त होते व त्यानंतरच तुमच्या कर्मांना खऱ्या ''पुरुषार्थाची'' पातळी प्राप्त होते. पुरुष स्वरूपातील कायम स्वरूपाचा बदल (Permanent conversion of Human Form) हा संदर्भ इथे अपेक्षित आहे!!

भौतिक जीवनात हा पुरुषार्थ करण्यासाठी कर्म करावे लागते. ते अशा 'उन्नत पद्धतीने' झाल्यासच जीवात्म्याच्या पातळीवर 'आत्मपरिवर्तन' होऊ शकते. नाहीतर हा भौतिक शारीरिक (Body consciensness) मधील बदल केव्हाही कोसळून पडू शकतो.

**संस्कार म्हणजे काय?**

संस्कार हे एखाद्या, फिल्टर किंवा स्फटिकासारखे असतात. या जगात 'जन्मसिद्ध संस्कार' हे पूर्व जन्मात प्राप्त झालेले असतात. ह्या 'जीवात्म्याला' त्यानंतर स्वकर्माने हे उच्च श्रेणीत संस्कारित करण्याची संधी मिळते. ती क्रिया शास्त्र स्वरूपात योगिक क्रियेमार्फत कशी होते हे 'पातंजल दर्शनात' सांगितले आहे. पण, या क्रिया सामाजिक जीवनांत भौतिक स्तरावर प्रत्यक्षात घडणाऱ्या सामाजिक, राजकीय व इतर सामान्य व्यवहाराने संघर्षाने न कळत काही प्रमाणात घडत असतात. त्या क्रियांचे Detailed बारकाईने शास्त्रीय वर्णन कुठेही मिळत नाही. पण व्यष्टी, समष्टी, सृष्टी व परमेष्ठी यांच्या आत्मस्वरूपात व पातळीवर होणाऱ्या अदृश्य पण प्रत्यक्ष व्यवहार कर्मात ह्या योगिक क्रिया सूक्ष्मपणे घडत असतात, असे म्हणावयाला हरकत नाही. हे व्यक्तिगत संस्कार एखाद्या चष्म्यासारखे असते व त्यामुळे संसार चक्रात, जीवनात होणाऱ्या व्यवहारात व्यक्ती व्यादी व समष्टीमध्ये त्याच्या गुणवत्तेबरहुकूम फरक पडतात.

यावर, योगिक संशोधन होणे आवश्यक आहे.

या विवेचनाचा सारांश असा आहे, की समाजातील बदल वा परिवर्तन हे 'भौतिक स्तरावर' घडतच असते. पण ते दिशाहीन व एखाद्या जलाशयावरील उथळ तरंगाएवढेच टिकणारे असते. पण, जो परिवर्तनाचा बदल हा 'बीजस्वरूपातील' बदलाएवढा खोल व शाश्वत हवा असतो, तो मात्र वैश्विक यंत्रणेच्या जन्म, मृत्यू, पुनर्जन्म व पुरुष स्वरूपाच्या गुणप्रवृत्ती व संस्कार यांच्या अत्यंत गूढ भावावरच होत असतो. त्यामुळे 'राक्षसाचा' 'समाज पुरुष' होणे ही क्रिया त्याच्या 'आत्मस्वरूपांत' व्हावयाला वा असावयाला हवा !

## वैश्विक नैसर्गिक वा शास्त्रीय योजना

त्याची ही यंत्रणा विश्वरचनेत योजलेली आहे ती जाणीवपूर्णक वापरण्याची युक्ती 'योगशास्त्र' आहे. ऋषी, मुनी, योगी ह्यांच्या प्रयत्नांनी ती भारतात शोधली गेली आहे व तिचा वारसा भारतातील समाजाने संभाळला आहे. 'युगायुगांत जपला आहे.'!!

सध्या मात्र तो विस्कळीत अवस्थेत व पुष्कळशा प्रमाणांत विस्मृतीत गेला आहे! त्या शास्त्राचा, योग साधनेचा आग्रह भारतातल्या अवतारी पुरुष, ऋषी, मुनी, योगी, संत यांनी वारंवार केला आहे. 'भगवद्गीता', 'ज्ञानेश्वरी' सारखी उदाहरणे या क्रियांच्या पुराव्यादाखल देता येतील.

## उदाहरणार्थ क्रिया

टिकाऊ व शाश्वत परिवर्तन म्हणजे काय याचे साधे उदाहरण पाणी व दूध यांमधील अग्नी ह्या (दैवीशक्तीच्या) मार्फत कसे होते ते पाहू या.

पाण्याला जर उष्णता दिली तर त्याचे 'बाष्पा' मध्ये परिवर्तन होते, पण त्याच वाफेला थंड केले तर पुन्हा साध्या 'जल' किंवा 'पाणी' या अवस्थेत पतन होते. पण हीच अग्निशक्ती दूधाला वापरली तर त्याचे तूप म्हणजे 'घृत' स्थितीत परिवर्तन होते. उलट क्रिया करून 'घृत' अवस्थेचे दूध ह्या अवस्थेत परिवर्तन होत नाही. पाणी व दूध या वस्तू शरीर व जीवात्मा ह्या फरकाने अनुक्रमे जाणल्या पाहिजेत. इथे 'आत्मा' हा Receiver हवा!!

लोखंडाला 'Hardening Process' लावताना त्याच्या भट्टीमध्ये तापवून 'Bright Hot' म्हणजे शुभ्र पांढऱ्या ज्वलन अवस्थेत आणल्यावर थंड पाण्यात एकदम बुचकळल्यावर त्या लोखंडाचे परिवर्तन कायम स्वरूपाचे होते. हा अनुभव सामान्यपणे आपल्या संदर्भात उदाहरण म्हणून देण्यासारखा आहे. जेव्हा सामान्य व्यक्ती सत्त्व, रज, तम ह्या तीन गुणधर्माच्या वैश्विक यंत्रणेमध्ये भौतिक पातळीवर 'शरीरबद्ध आत्मा'(Embodied Consciousness) ह्या स्वरूपात सामाजिक, व्यावहारिक जीवन जगत असतो, त्यावेळेस त्या प्रत्येक जन्मात होणाऱ्या कर्माचे जीवन संघर्षाचे, व्यवहाराचे परिणाम केवळ जलतरंग, इतकेच वरवरचे व पृष्ठभागावरील पातळीचे होतात. बीजस्वरूपातील शाश्वत गुणधर्मातील बदल अशा स्वरूपाचे होत नाहीत. थोडक्यात अशास्त्रीय संस्कार क्रिया या 'घृत' स्वरूपाच्या होत नाहीत. या 'संस्कारांना' जन्म, मृत्यू, पुनर्जन्म ह्या प्रवासात पुन्हा पुन्हा सामील व्हावे लागते. पण, जर या शरीरातील सामान्य इंद्रियांच्या मर्यादित शक्तीतच हे संस्कार होणार असतील तर ते कायम स्वरूपाचे नसतील.

## मूलगामी बीजात्मक परिवर्तन

तेव्हा भौतिकवादी ज्या राजकीय, सामाजिक, आर्थिक यंत्रणेमार्फत कायम स्वरूपाचे व निश्चित सात्त्विक स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणण्याची घोषणा करतात, त्यांना हा मूलगामी परिवर्तनाचा बदल घडवून आणणे हे अशक्य आहे.

---

मनाची अखंड समाधानाची अवस्था म्हणजे 'मोक्ष'!

**Marxist Experiment समाजवादी क्रांती**

ह्याची ठळक उदाहरणे रशिया, चीन वगैरे देशांतील क्रांतीचे देता येईल. ("Capitalist system into a communist political system") भांडवलदारी समाजरचनेचे समाजसत्तावादी सत्तेमध्ये योजलेले परिवर्तन पूर्णपणे न झालेले व फसलेले दिसेल! व्यक्तिगत स्तरावर ही Exploitation & corruption म्हणजे पिळवणूक व भ्रष्टाचार नाहीशी करण्याची राजकीय कामगिरीही फोल गेलेली दिसली आहे. हा प्रयोग (Experiment) केवळ एका शतकातच कोसळून पडला. याची कारणे **'भौतिकवादी समाजशास्त्रात'** मिळणार नाहीत!

**भिन्न राष्ट्रीय संस्कृती**

आता आपण जगातील निरनिराळ्या संस्कृतींचा विचार डोळ्यासमोर आणू या! मुळात 'संस्कृती' ह्या संस्कृत शब्दाला विशेष अर्थ आहे तो 'Civilization' त्या इंग्रजी शब्दामार्फत पूर्णपणे जाणला जाणार नाही. संस्कार क्रिया ह्या पृथ्वीवरील जीवनात बहुतांशी चार प्रकारांनी जाणल्या जातात. त्याचे संपूर्ण वर्णन ''दैशिक शास्त्र'' ह्या विशेष पुस्तकातून सापडेल. प्रथम हे संस्कार 'जीवात्म्यावर' आरूढ असतात व 'जन्ममृत्यू, पुनर्जन्म' या वैश्विक प्रवासात वर्धिष्णू होतात. त्यांतील केवळ जन्मामुळे प्राप्त होणाऱ्या संस्कारांमुळे प्रत्येक जीवात्मा वेगवेगळ्या प्रवृत्तीचा बनून शरीर धारणेत बद्ध होत असतो. त्यांनतर, उपनयन वगैरे संस्कारांनी त्याला विशेष शिक्षण आध्यात्मशास्त्र व योगशास्त्र यांचे सहाय्याने आश्रमात दिले जात असे. 'गायत्री मंत्र साधना' ही एक नमुन्यासाठी उद्धृत करू शकू.

ह्या साधनेने 'सविता सूर्य' या पृथ्वीवरील जीवनाच्या चैतन्य व जीवन व्यवहाराच्या गुरुकडून – भुः भुवः स्वः या तीन शरीरांतर्गत कृती व 'गार्हपत्य, दक्षिणअग्नि व आहव या आग्नि' या 'शरीर यंत्र.' (श्रीयंत्र) या उपकरणाने भौतिक व्यवहारातील अनुभूतींचे उन्नतीकरण भौतिक ज्ञान, मानसिक ज्ञान व अध्यात्मिक ज्ञान या तीन पातळींवर करण्याची क्रिया 'आत्मिक यज्ञा'द्वारे केली जात असे. या एका उदहारणाप्रमाणे जवळ जवळ '१६ संस्कार'प्रमुख क्रिया या भारतातील समाजशास्त्रात रूढ केल्या होत्या. आज त्या अर्थहीन अवस्थेत व अशास्त्रीय पद्धतीत ऱ्हास होऊन पडल्या आहेत.!!

'विवाह संस्कार' व अंत्यसंस्कार या काही ठळक संस्कार क्रिया आपल्या या लेखाच्या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. या अनेक संस्कारांने सुसंस्कृत असा 'जीवात्मा' या भारत राष्ट्रामध्ये 'व्यक्ती' या स्वरुपात पुढल्या प्रवासासाठी युक्त केला जात होता. त्यांनतर व्यक्ती, समष्टी, सृष्टीमध्ये त्याचा जीवन व्यवहार पुरा होऊन 'जीवात्मा' हा संपृक्त संकारांनी भारून 'अंत्यसंस्कारांनी' युक्त होऊन पुढील मृत्यूनंतरच्या (देहत्याग) प्रवासाला लायक होत होता. सत्यलोक म्हणजे (भूःभुवःस्वः) जनः, महा, तपः, सत्यम् ह्या क्रमयुक्त लोकामध्ये फिरत होता. त्याचे ध्येय 'शिवो अहं किंवा अहं ब्रह्मास्मि, किंवा ह्या विश्वाच्या निर्मात्याशी मिलन, Intelligent Designer अथवा जीवात्म्याचे परमात्म्याशी मीलन, असा संस्कार शास्त्राचा राजपथ, म्हणजे "Roadilap of Divine Cousciousness" या पद्धतीचा प्रवास होता.

**True and Real Transformation**

सामाजिक जीवन किंवा "Nation Building and Transformation", राष्ट्र परिवर्तन याबद्दलचे भौतिकवादी वर्णन सगळ्या देशात व राष्ट्रात जगभर चालू आहे. भारताच्या सध्याच्या निवडणूक धुमाळीतही (२०१४) ह्याची निरनिराळी स्वरूपे जाहीर होत आहेत. उदहारणार्थ 'रोटी, कपडा और मकान'' किंवा "Good Governance, Good progress" रस्ता, बिजली, पाणी किंवा उत्कृष्ट राज्य, समाज नियंत्रण, उत्कृष्ट, प्रगती वगैरे किंवा भ्रष्टाचार

निर्दालन, गरीबी हटाव वगैरे वगैरे. पण, ही झाली भौतिक स्तरावरील जनतेच्या, समाजाच्या समस्यांची नावे आणि अशा आकांक्षांची नामफलके. पण जोपर्यंत व्यक्ती, समष्टी व सृष्टीमध्ये हे मूलभूत गुणात्मक परिवर्तन होणार नाही, तोपर्यंत ह्या फक्त घोषणाच रहाणार!!

**Two Planes दोन पातळ्या**

या परिवर्तनाची दोन अंगे, म्हणजे भौतिक स्तर वा पातळी व दुसरी अध्यात्मिक म्हणजे आत्मसंस्कारांचे उन्नतीकरण, सत्विकीकरण व 'दैवी संपदाचे' आगमन – हे दोन्ही मार्ग वेगवेगळे व एकांगी नसून परस्पर संबंधी अशा नात्यागोत्याचे असतात. असे परिवर्तन ज्या नियमांवर व समीकरणांवर वा शारआंवर होणार त्या यंत्रणा 'भौतिक अधिक अध्यात्मिक' म्हणजे "Integral Spiritualism"



या शास्त्रीय तत्त्वज्ञानावरील ज्ञानमार्गाने, साधनांनी व वैश्विक निर्मितीमध्ये भागीदार असलेल्या तत्त्वांवर (Principles) शक्तींवर (Pranik Shakti) आधारून होणे आवश्यक आहे. तेव्हा व केवळ तेव्हाच त्या परिवर्तनाला, खरा अर्थ व यश व स्थैर्य प्राप्त होईल!! तेव्हाच, या राष्ट्राला म्हणजे भारताला त्याचा **'दैवी परिवर्तनाचा'** लाभ होईल. ह्या परिवर्तनाची अभिप्सा 'Aspiration' ह्या परिवर्तनाची आशा आकांक्षा युनानुयुगे, ही जीवात्म्याने त्याच्या मूळ स्वरूपात बाळगली आहे. ती वेदिक ऋषी, मुनी वगैरेनी ऋृती ज्ञानाने जाणली आहे. ती व्यवहारांत उतरवण्याची ही वेळ, वा मुहूर्त आला आहे. तो यशस्वी होवो हीच प्रार्थना!!

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com

●●●

## *ऑक्सफर्ड शब्दकोश आता फक्त महाजाळावर*

जगभरात अतिशय खात्रीदायक म्हणून वापरला जाणारा ऑक्सफर्ड शब्दकोश (ओइडी) यापुढे मुद्रित स्वरूपात आढळणे कठीण आहे. त्याचा मोठा आकार हा कोश केवळ ऑनलाईन उपलब्ध असणे हे अभ्यासकांना परवडणारे व उपलब्ध करून देणारे ठरणार आहे. जगप्रसिद्ध अशा या कोशाची पुढील आवृत्ती ४० खंडांची असेल व ती काळाच्या २० वर्षे मागे राहणारी इरेल, असा अंदाज केला जात आहे.

मचवेल प्रोर्फाट ओइडीचे पहिले नवे २० वर्षासाठीचे संपादक यांच्या मते असे होण्याचे कारण ही जगप्रसिद्ध, प्रमाण अशी कृती मुद्रित स्वरूपात येण्यास होणारा उशीर व माहितीचे अपलोडिंग ही आहेत.

**– संकलित**

# परिसर वार्ता - २

**– संकलित**

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### १. राष्ट्रीय चर्चासत्र : १ फेब्रुवारी

वि. प्र. मं. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी मॉडेल महाविद्यालय, डोंबिवली यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात भाग घेतला. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका व माध्यमे यांची लोकशाहीतील भूमिका या विषयावरील चर्चासत्रात श्रीमती जयाकुमार यांनी "Decriminalising politics for sustaining Demoracy in India & Reflections on the Recent Supreme court judgments." हा निबंध सादर केला.

### २. निवड समितीची बैठक

प्रभारी प्राचार्या व सहाय्यक प्रा. श्रीविद्या जयाकुमार यांच्या प्रथम स्तर बढती संदर्भात महाविद्यालयात एक बैठक घेण्यात आली. सदर समितीने बढती संदर्भातील कागदपत्रे विद्यापीठाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविली आहेत.

३. आडवाणी विधी महाविद्यालय, मुंबई यांनी दिनांक ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान आयोजित केलेल्या 'विधी किरण' या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

१. अभिरूप न्यायालय स्पर्धा – आकाश वारंग आणि मनीष काळे

२. मुख्य न्यायाधीशास पत्र स्पर्धा –
अंजली पंडीत– तृतीय विधी
राजन लकुरे – प्रथम विधी

### ४. दिल्ली अभिरूप न्यायलय स्पर्धा

महाविद्यालयाचे विद्यार्थी रंजनी कृष्णन आणि कृष्णा कामत द्वितीय विधी व आकाश वारंग यांनी दिल्ली अमेती विद्यापीठ येथे आयोजित आंतरराष्ट्रीय फौजदारी कायदा या अभिरूप न्यायालय स्पर्धेमध्ये भाग घेतला.

५. दिनांक ८ फेब्रुवारी महाविद्यालयामध्ये विशेष शिकवणीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खालील विषयांवर वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

१. Probation of oftendecs Act, 1958 : श्री. भास्कर डि. खत्री (२५ वर्षांचा अनुभव)

२. 2013 Amendment to Indian Panal code : श्री. मनोज भट (वकील आणि प्राध्यापक)

### ६. डॉ. वा. ना. बेडेकर वादविवाद स्पर्धा

दिनांक २० फेब्रुवारी रोजी महाविद्यालयात ९ व्या वा. ना. बेडेकर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धा ही प्रांगणातील पेशवे सभागृह येथे घेण्यात आली. खालील महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला.

१. विधी महाविद्यालय, ठाणे
२. नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर
३. जितेंद्र चौहान विधी महाविद्यालय, विलेपार्ले
४. न्यू लॉ कॉलेज, माटुंगा
५. प्रवीण गांधी लॉ कॉलेज, विलेपार्ले
६. विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे विधी महाविद्यालय, चेंबूर
७. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नेरूळ

या स्पर्धेचे उद्घाटन वि. प्र. मं. चे कोषाध्यक्ष श्री. एम. वाय. गोखले यांनी केले. त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून निवृत्त जिल्हा न्यायधीश

श्री. एस. एस. देशमुख व ॲड. स्मिता जामकेर होते.

यावेळी खालील विषयांवर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

१. The age of Juvenile should be lowered to 16 by amending Juvenile Justice Act, 2000.

२. Domestic Biolence Act 2005 is grossly infringing the rights of men.

३. S-149 of the companies Act,2013 compulsorily requiring atleast one women director should be declared unconstitutional.

स्पर्धेमध्ये खालील स्पर्धक विजेते ठरले.

१. विद्या प्रसारक मंडळाचे टि. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे.
२. प्रवीण गांधी विधी महाविद्यालय, विलेपार्ले
३. डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नेरूळ

या स्पर्धेमध्ये वैयक्तिक पारितोषिकेदेखील देण्यात आली, ती पुढील प्रमाणे :

१. प्रथम सर्वोत्कृष्ट वक्ता : अभिजित सावंत – ठाणे विधी महाविद्यालय
२. द्वितीय सर्वोत्कृष्ट वक्ता – मनीष काळे– ठाणे विधी महाविद्यालय
३. तृतीय सर्वोत्कृष्ट वक्ता – कृष्णा त्रिवेदी – प्रवीण गांधी विधी महाविद्यालय

### ७. विधी चाचणी परीक्षा

महाविद्यालयामध्ये वा. ना. बेडेकर वादविवाद स्पर्धे सोबत विधी चाचणी परीक्षा देखील घेण्यात आली. सदरच्या स्पर्धेमध्ये ६० पर्यायी उत्तरांची प्रश्नावली तयार करण्यात आली होती. १५ प्रश्न हे सामान्य ज्ञान व ४५ प्रश्न भारतीय संविधानावर आधारित होते.

श्रीविद्या जयाकुमार यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली होती. ज्यामध्ये प्रा. विनोद वाघ व प्रा. मिथुन बनसोडे यांचा समावेश होता. सदर समितीने चाचणी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न केला. यामध्ये खालील स्पर्धक विजेते ठरले.

१. प्रथम : संतोष गिरी, वि.प्र.मं. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालय, ठाणे

२. द्वितीय : नितीन कासकर, न्यू लॉ कॉलेज, माटुंगा

३. तृतीय : क्रिसटीना कारलास, जे. सी. विधी महाविद्यालय, नेरूळ

### ८. मराठी दिन

महाविद्यालयाने २६ फेब्रुवारी रोजी प्रांगणातील पेशवे सभागृह येथे मराठी दिन मोठ्या उत्साहात साजरा केलां. यावेळेस मराठीतील विविध गीते विद्यार्थ्यांनी साजरी केली. प्रा. बनसोडे यांनीदेखील कविता सादर केली. कवितेचे नाव ''१४ फेब्रुवारी'' असे होते. उपस्थित सर्व श्रोत्यांकडून यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### ९. मराठी नैपुण्य चाचणी स्पर्धा व वक्तृत्त्व स्पर्धा

दिनांक २५ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयामध्ये मराठी दिनाचे औचित्य साधून मराठी नैपुण्य स्पर्धा मराठी वाङमय मंडळाने यशस्वीरित्या पार पाडली. या स्पर्धेमध्ये खालील स्पर्धक विजेते ठरले.

**वक्तत्त्व स्पर्धा**

१. संतोष गिरी (तृतीय विधी) – प्रथम बक्षीस

२. संगीता रोकडे (द्वितीय विधी) – द्वितीय बक्षीस

३. मोहन निबंलकर (तृतीय विधी) – उत्तेजनार्थ बक्षीस

**नैपुण्य चाचणी स्पर्धा**

१. संगीता रोगडे (द्वितीय विधी) – प्रथम बक्षीस

२. राजन लाकुरे (प्रथम विधी) – द्वितीय बक्षीस

३. संतोष गिरी (तृतीय विधी) – तृतीय बक्षीस

दि. २८ जानेवारी २००४ रोजी विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या या पदाचा कार्यभार सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी स्वीकारला. त्यांना १० वर्षे पूर्ण झाली. दरम्यानच्या कालावधीमध्ये यु.जी.सी.कडून महाविद्यालयाचे परीक्षण आणि मूल्यांकन करण्यात आले. मुंबई विद्यापीठातील सर्व विधी महाविद्यालयांमध्ये हे महाविद्यालय एकमेव असे आहे, ज्याचे मूल्यांकन करण्यात आले आहे. दि. १६ सप्टें २००४ रोजी विभागीय गणनेनुसार ६१.१५ या मूल्यांकनाने महाविद्यालयाची नोंद करण्यात आली. आजही एकमेव 'मूल्यांकित महाविद्यालय' म्हणून महाविद्यालयाची गणना केली जाते.

सन २००६–०७ मध्ये महाविद्यालयाचे वार्षिक वृत्तपत्र ''विधिज्ञ'' काढण्यात आले. सन २०१०–११ पासून प्रत्येक सत्रात पूर्व परीक्षांचे आयोजन करण्यात आले. याच सालापासून महाविद्यालयाने ''संविधान दिवस आणि मराठी दिवस'' साजरा करण्यास सुरुवात केली.

२०१०–११ पासून प्रात्यक्षिक परीक्षेची प्रश्नपत्रिका महाविद्यालयाने इंग्रजी सोबत मराठीमध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली. वार्षिक क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन दरवर्षी नियमितपणे करण्यात येते.

फेब्रुवारी २००६ पासून विधी महाविद्यालय आंतर महाविद्यालयीन वाद–विवाद स्पर्धेचे आयोजन करते. स्व. डॉ. वा. ना. बेडेकर माजी अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ यांचे स्मृतिप्रीत्यर्थ हि स्पर्धा घेतली जाते. विद्यार्थ्यांना विद्यापीठामध्ये क्रमांक मिळवून यशस्वी होण्यासाठी तसेच विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धा, क्रीडा यांत सहभागी होण्यासाठी चालना दिली जाते. सन २००४–२०१३ या कालावधीमध्ये आपल्या महाविद्यालयातून सात वेळा मुलांनी मुंबई विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक मिळविला असून वेळोवेळी होणाऱ्या विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. यावर्षी (२०१३–१४) मुंबई विद्यापीठामध्ये झालेल्या युवा महोत्सवामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच महिला बॅडमिंटन प्रथम आणि पुरुष बॅडमिंटनमध्ये तृतीय क्रमांक पटकाविला. याचबरोबर महाविद्यालयामध्ये रिक्त असलेल्या दोन सहा. प्रा. आणि ग्रंथपाल या जागा भरण्यासाठी प्रयत्न करून भविष्यामध्ये कृतिशील, कार्यक्षम शिक्षकांची तासिका तत्त्वावर भरती करण्यासाठी यशस्वीपणे प्रयत्न करण्यात आले.

प्राचार्य या रिक्त पदाची जागा भरण्यासाठी सर्व आवश्यक गोष्टी करण्यात आल्या. सन २००८ पासून विधी सहाय्यता विभागाची स्थापना करण्यात आली. सन २०१२–१३ पासून दर शुक्रवार आणि शनिवार मोफत समुपदेशन केले जाते. सहा. प्रा. विनोद वाघ याचे मुख्य आहेत. २००६–२००७ या वर्षापासून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑन लाईन प्रवेशाची सोय करून देण्यात आली. सन २००५ पासून ग्रंथालयाच्या संगणक विभागाची सुरुवात करण्यात आली.

दि. ३० जानेवारी रोजी श्रीविद्या जयकुमार यांनी प्रभारी प्राचार्य म्हणून आलेले अनुभव "Building the institute" म्हणून आयोजित केलेल्या Panel Discussion मध्ये सांगितले. "Chrysalis 2014" या सदरांतर्गत जोशी–बेडेकर या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमामध्ये मंडळाच्या विविध विभागांच्या महाविद्यालयांच्या प्रमुखांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाला उद्देश व्यवस्थापनामध्ये असणारी आव्हाने, गुण आणि दृष्टिकोन जाणून घेणे हा होता.

**निवृत्ती** : सौ. मंगल घाटणेकर दि. ३० नोव्हेंबर

ईश्वर पावलोपावली पुण्य कमावण्याची संधी देत असतो. जो ती ओळखतो, तोच त्यातून पुण्य मिळवतो.

२०१३ रोजी ३३ वर्षे सेवा देवून वरिष्ठ लिपीक या पदावरून सेवानिवृत्त झाल्या. आमचे कडून हार्दिक सदिच्छा!

### विधी प्राथमिक परीक्षा आणि निकाल

महाविद्यालयाने दिनांक १ मार्च २०१४ रोजी विधी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली. सदर परीक्षेचे निकाल दिनांक १० मार्च रोजी जाहीर करण्यात आले. दिनांक २५ मार्च रोजी पुन्हा एकदा सदर परीक्षा अनुपस्थित व अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आल्या. यावेळी दिनांक ७ एप्रिलला निकाल जाहीर करण्यात आला.

### अभिरूप न्यायालय परीक्षा

महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या प्रात्यक्षिक अभ्यासक्रमाप्रमाणे दिनांक १० ते १५ मार्च या कघालावधीत अभिरूप न्यायालय परीक्षा घेण्यात आली. दिनांक १८ मार्च रोजी VIVA घेण्यात आली. दिनांक ६ मार्च रोजी सायं. विशेष सत्राचेदेखील आयोजन करण्यात आले.

### अभिरूप न्यायालय स्पर्धा

विवेकानंद विधी महाविद्यालय चेंबूर, मुंबई यांनी दिनांक १ मार्च रोजी अभिरूप न्यायालय स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धेमध्ये 'दूरदर्शन मालिकेतील किंवा कार्यक्रमासाठी मार्गदर्शक तत्वे' यासंबंधी खटला देण्यात आला. त्या स्पर्धेमध्ये विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, मनीष काळे, सौमील आणि राजन लाकुरे (प्रथम विधी) यांनी भाग घेतला.

### वार्षिक स्नेहसंमेलन

दिनांक २२ मार्च रोजी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. कघार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त जिल्हा न्यायधीश श्री. जे. के. दास हे उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक वर्षे २०१३-२०१४ मध्ये महाविद्यालयाने आयोजित केलेल्या विविध स्पर्धेमधील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि.प्र.मं.चे श्री. कयाळ उपस्थित होते.

## तंत्रनिकेतन

### डॉ. सौ. उषा राघवन यांना ISTE उत्तर प्रदेश सरकारचा राष्ट्रीय सन्मान.

डॉ. सौ. उषा राघवन ह्या वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे येथे माहिती तंत्रज्ञान शाखेत विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. नुकतीच सन २०१२ मध्ये त्यांनी "Evolution of Opto-electronic properties of Semi conductor nano materials" या विषयात पुणे विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे केलेले कार्य हे उल्लेखनीय असून अनेकांना ते प्रेरणादायी ठरत आहे. त्यांचे वाचनही विविधांगी आहे. माणसाची अचूक ओळख, कार्यनिष्ठा, माहिती तंत्रज्ञानातील नवीन-नवीन घडामोडींशी संलग्न आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक, अशी त्यांची वैशिष्ट्ये होत.



**डॉ. सौ. उषा राघवन (विभाग प्रमुख माहिती तंत्रज्ञान वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे ) यांना ISTE च्या राष्ट्रीय अधिवेनात ISTE उत्तर प्रदेश सरकारच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करताना.**

नुकताच त्यांना २०१३ करिता ISTE उत्तर प्रदेश सरकारचा राष्ट्रीय सन्मान अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल दिला गेला. ४३ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग टेक्नालॉजी, वारणानगर कोल्हापूर-महाराष्ट्र येथे डिसेंबर २०१३ रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. घटनेने तंत्रनिकेतनच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

**प्रसिद्ध दिग्दर्शक श्री. संजय जाधव यांचे शुभहस्ते विद्यार्थ्यांचा गुणगौरव**

दरवर्षीप्रमाणे तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचा 'पॉलीस्पार्क' वार्षिकोत्सव डिसेंबर-२०१३ मध्ये उत्साहात पार पडला. त्या अंतर्गत विविध स्पर्धा घेतल्या जातात. त्यामध्ये सहभागी होऊन विद्यार्थी कौशल्ये दाखवितात. शिवाय शैक्षणिक गुणवत्तेत तंत्रनिकेतनात अव्वल आलेल्या सर्वच शाखेतील विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात. या वर्षीचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध मराठी सिनेदिग्दर्शक श्री. संजय जाधव यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. सुपरहिट मराठी चित्रपट 'दुनियादारी' ह्या चित्रपटाचे दिग्दर्शन श्री. जाधव यांनी केले आहे. शिवाय बऱ्याच मराठी चित्रपटांच्या यशात त्यांचा मोलाचा वाटा आहे. उदा. डोंबिवली फास्ट, खिचडी इ.



**विद्यार्थ्यांना पारितोषके देताना प्रसिद्ध सिनेदिग्दर्शक श्री. संजय जाधव**

प्रा. सौ. किर्ती अगाशे यांनी उपस्थितांना त्यांची ओळख करून दिली. त्यानंतर श्री. जाधव आणि मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांचा पारितोषके देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार प्रा. गुप्ते, एस. एम. इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी केलेल्या भाषणात श्री. जाधव यांनी मेहनतीला पर्याय नाही शिवाय कोणताही शॉर्टकट वापरून पुढे जाता येत नाही असे सांगितले. आई-वडिल, शिक्षक आणि मित्र परिवार इत्यादींचे महत्त्व आपल्या यशात असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. या त्रिमूर्तींना कधीच विसरू नका असा मोलाचा सल्ला उपस्थितांना दिला. विद्यार्थ्यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेली. त्यातून अशा प्रसिद्ध दिग्दर्शकाचा जीवनपट समोर आला.

**करिअर फेअर - २०१४ चे आयोजन**

शनिवार दि. ४ जानेवारी रोजी वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन आणि महाराष्ट्र राज्यतंत्र शिक्षण मंडळ याचे संयुक्त विद्यमाने करिअर फेअर-२०१४ चे आयोजन तंत्रनिनिकेतनच्या प्रांगणात करण्यात आले होते. विविध अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने, प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, उत्पादन करणाऱ्या कंपन्या इत्यादींचा फेअरमध्ये सहभाग होता. फेअरमध्ये पदविका प्रगत पदविका, पदवी, व्यवसायिक कोर्स, विविध प्रकारच्या बँका त्या देत असलेल्या शैक्षणिक कर्जे आणि मार्गदर्शन सत्रे इत्यादींची माहिती देण्यात येत होती. दहावीनंतर करिअरच्या असलेल्या विविध संधींविषयीची महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळत होती.

डॉ. उषा राघवन आणि त्यांच्या सहकार्याने मार्गदर्शन सत्रे यशस्वीरित्या पार पाडली. तज्ज्ञ म्हणून प्रा. ए. एस. अंधारे (ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी MSBTE मुंबई) डॉ. एस. सी. आगरकर (प्रोफेसर, मॅथेमॅटिक्स वि. प्र.

मंडळाचे व्यवस्थापन संस्था) प्रा. एस. एस. मुजुमदार (माजी प्राचार्य मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) श्री. सलिल नेरुरकर (रिजनल मॅनेजर, जी ई मोटर्स) व सौ. योगिता कटरे (सिनिअर फॅक्सी TAACT ट्रेनिंग इन्स्टिट्यूट) इत्यादी होते.

विज्ञानामध्ये अनेक पर्याय उपलब्ध असल्याचे डॉ. आगरकर यांनी या प्रसंगी स्पष्ट केले. औद्योगिकीकरणामध्ये यांत्रिकीकरणाचे महत्त्व या संबंधीची माहिती डॉ. सौ. कटरे यांनी सांगितली. प्रा. मुजुमदार यांनी अभियांत्रिकी पदवीला प्रवेश निश्चित करायचा असेल त्यांनी पदविका करून घेणे योग्य असल्याचे स्पष्ट केले. श्री. नेरुरकर यांनी कम्युनिटी कॉलेज आणि व्यावसायिक प्रशिक्षण, शिवाय महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ राबवीत असलेल्या वेगवेगळ्या अभ्यासक्रमांबद्दल माहिती करून दिली.



**'करिअर फेअर' मध्ये सहभागी झालेल्या स्टॉल्सना भेट झाल्यावर सर्वात पुढे श्री. ए. एस. अंधारे आणि इतर मान्यवर**

सकाळी ९.०० वाजता श्री. ए. एस. अंधारे आणि सन्माननीय पाहुणे यांचे हस्ते स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी स्टॉल्सची पाहणी केली. अनेक विद्यार्थी , शिक्षक, पालक, कर्मचारी वर्ग इत्यादींनी स्टॉलना भेट देऊन माहिती घेतली.

**'Process Safety Management' या पंधराव्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन**

सुरक्षिततेमुळे अपघात घडू शकत नाही म्हणूनच औद्योगिक क्षेत्रात सुरक्षिततेला अतिशय महत्त्व आहे. ही काळाची गरज ओळखून त्या संबंधीची जाणीव करून देण्याच्या हेतूनेच 'Process Safety Management' संबंधीचा मुख्य विषय घेवून तज्ज्ञामध्ये विचार-विनिमय घडवून आणण्यासाठी वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनने ही १५ वी एक दिवसीय राष्ट्रीय परिषद शनिवार दिनांक ४ जानेवारी रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात सकाळी ९.०० ते ५.०० या वेळेत घेतली.

तत्पूर्वी 'करिअर फेअर' या उपक्रमाचे सन्मानीय अतिथी श्री. ए. एस. अंधारे (माजी तंत्रशिक्षण संचालक) आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. करिअर फेअरमध्ये अनेक शैक्षणिक संस्था, बँका, उत्पादन करणाऱ्या कंपन्या, सेवा देणाऱ्या संस्थांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थी, शिक्षक व पालकवर्ग यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. हा उपक्रम वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.

राष्ट्रीय परिषदेची सुरुवात ईशस्तवनाने झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. आर. एन. मोहंती (डायरेक्टर, पीडीलाईट, सन्माननीय अतिथी श्री. ए. एस. अंधारे (माजी संचालक, तंत्रशिक्षण आणि ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई) प्रमुख वक्ते श्री. सी. एस. लिमये, संचालक, सुपरटेक इन्स्ट्रुमेंटेशन सर्व्हिस (इंडिया) प्रा. लि. प्रथम सत्राचे प्रमुख श्री. जे. एन. कयाळ (सहकार्यवाह, वि. प्रसारक मंडळ ठाणे) इत्यादी मान्यवर मंडळी उपस्थित होती. शिवाय औद्योगिक आणि क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभागही होता.

शैक्षणिक परिषदेचे आयोजक प्रा. दि. कृ. नायक यांनी परिषद आयोजना मागचा उद्देश व भूमिका उपस्थितांना स्पष्ट करून दिली. त्यानंतर प्रमुख पाहुणे आणि मान्यवरांच्या शुभहस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.




**'Process Safety Management' या १५ व्या एक दिवसीय परिषदेत उपस्थित असलेले व्यासपीठावरील मान्यवर डावीकडून श्री. प्रोफेसर डी. के. नायक, श्री. सी. एस. लिमये, श्री.आर. एन. मोहंती, श्री. ए. एस. अंधारे, श्री. जे. एन. कयाळ, व सौ. व्ही. ए. जोशी.**

प्रमुख पाहुणे आर. एन. मोहंती यांनी सुरक्षितते संबंधीचे नवीन दृष्टिकोन आणि पद्धती या विषयीची माहिती करून दिली. क्षेत्रावर कार्य करणारी प्रत्येक व्यक्ती ही सुरक्षित कार्यरत असली पाहिजे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

अंधारे साहेब यांनी करिअर फेअर चे महत्त्व विषद केले आणि शॉर्ट टर्म कोर्स संबंधीची माहिती दिली.

प्रमुख वक्ते श्री. सी. एस. लिमये यांनी यांत्रिक दृष्टिकोनातून औद्योगिक प्रक्रियेमध्ये सुरक्षितता असणे आवश्यक आहे. त्यासाठी औद्योगिक प्रक्रियेमध्ये सुरक्षिततेसंबंधीची परिमाणे असावीत असे मत व्यक्त केले. त्यासाठी शिक्षित कर्मचारी औद्योगिक क्षेत्रात असला पाहिजे जेणे करून त्याला सुरक्षिततेसंबंधीचे ज्ञान होईल.

श्री. जे. एन. कयाळ यांनी तंत्रनिकेतन करीत असलेल्या कामाबद्दल गौराद्गार काढले. शेवटी उद्घाटनपर सत्राचे परिषदेच्या संघटन सचिव प्रा. सौ. व्ही. ए. जोशी यांनी आभार मानले.

दुसऱ्या सत्राचे कामकाज श्री. प्रशांत पी. कोकीळ (प्रमुख, कार्पोरेट इन्व्हायरमेंट, टाटा पावर कंपनी लि. मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. खालील तज्ज्ञांनी आपले निबंध सादर केले ते सादरकर्ते वक्ते आणि निबंध खालीलप्रमाणे

| निंबध सादरकर्ते | निबंधाचे नाव |
|---|---|
| १. श्री. बिपीन दोशी (निवृत्त व्हाईस प्रेसिडेन्ट, स्पेशल प्रोजेक्टस् एक्सेल इंडस्ट्रिलय लि.) | "Process Safety Culture" |
| २. श्री. मंदार फडके (CEO, अभिसम सॉफ्टवेअर) | "An introduction to functional safely, SIL & FSM |
| ३. श्री. श्रीपाद लेले (असोसिएट व्हाईस प्रेसिडेन्ट (EHSQS) दीपक फर्टिलायझर्स अॅन्ड पेट्रोकेमिकल्स कार्पोरेशन लि. | "Industrial Hygiene and Occupational Health" |
| ४. डॉ. राजेश दुबे (डायरेक्टर, डिझास्टर मॅनेजमेन्ट इन्स्टिट्यूट, भोपाळ) | "Hazard and Risk Management Framework : prevention of chemical/Industrial disaster" |

आयुष्य तीन प्रकारांनी उत्तर देते... ते 'हो'म्हणते आणि तुम्हांला जे हवे असते, ते देते. ते 'नाही' म्हणते आणि तुम्हांध्ला जे हवे असते त्यापेक्षा चांगलं काहीतरी देते. ते 'थांब' म्हणते आणि जे सर्वोत्कृष्ट असेल, ते देते.

| निंबध सादरकर्ते | निबंधाचे नाव |
|---|---|
| ५. श्री. सतीश जोशी (सिनिअर, इंजिनिअरिंग मॅनेजर, प्रोसेस विभाग अकेर सोलुशन्स) | "SIS and SIL" |
| ६. श्री. अविनाश करमरकर (निवृत्त) मुख्य अभियंता (सेफ्टी ऑफ कायर)आरसीएफ लि. ट्रॉम्बे | "Practical-Behaviour based safety." |
| ७. श्री. ए. ए. रायचूर (तांत्रिक सल्लागार, राष्ट्रीय सेफ्टी काऊंसिलिंग (इंडिया) | "Process Hazard analysis & Risk Management" |
| तिसरे आणि अखेरचे सत्र २.३० ते ५.०० वाजेपर्यंतचे होते. तिसऱ्या सत्राचे कामकाज श्री. मंदार फडके यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. खालील वक्त्यांनी आपले निबंध सादर केले. | |
| ८. श्री. प्रशांत कोकिळ (प्रमुख कार्पोरेट इन्व्हारमेंट टाटा पॉवर कं. लि.) | "Process Safety Management" |
| ९. सौ. वंदना कुडाळकर (डेप्युटी जनरल मॅनेजर क्वॉलिटी ॲन्ड सेफ्टी EMCO इंडस्ट्रिज) | "Safety Culture at EMCO Ltd." |
| १०. श्री. रमेश बागी (निवृत्त कार्पोरेट असिस्टंट जनरल मॅनेजर, OHSE गोदरेज ॲन्ड बॉथसे मॅन्यु.कं.लि.) | "Measuring your way to EHS : Strategies for Measuring performance and improving your EHS program." |
| ११. श्री. प्रकाश जी. सायगावी (लेक्चरर सिव्हिल इंजिनिअरींग गव्हर्मेंट पॉलीटेक्नीक, ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी MSBTE मुंबई | "Risk Registers-Hand for controction projects" |
| १२. श्री. एस. डी. आरमले (सायंटिक्ल ऑफिसर (G)) श्री. आर. जी. येवलीकर (निवृत्त सायंटिकल ऑफिसर (H) BARC मुंबई) | "Process Safety Management: techniques of HAZOP and CHAZOP " |
| १३. श्री. किरण कुलकर्णी (प्रमुख मॅनेजर (मार्केटिंग) कामसाई नेरोलॅक पेन्टस लि. मुंबई) | "Process Safety Management in paint manufacturing process" |
| १४. श्री. जी. सुनिलकुमार (सिनिअर जनरल मॅनेजर-सेफ्टी, रिलायन्स इंडस्ट्रिज लि. रायगड) | "Safety Culture-Relationship to high consequence / low probability events" |
| १५. श्री. रणजीतकुमार तेली (डायरेक्टर, टॅली सेफ्टी सोल्युशन्स प्रा. लि.) | "PROMPT BBS approach to process Safety Management" |

दुःखी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात, प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त आहे.

दरम्यान पोस्टर प्रेझेंटेन्स स्पर्धा घेण्यात आली होती. त्यातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाची सांगता प्रा. सौ. एस. के. शुक्ला यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

**कर्मचारी सभा**

शनिवार दि. १ फेब्रुवारी रोजी तंत्रनिकेतनमध्ये कर्मचारी सभा आयोजित करण्यात आली. गेल्या दोन तीन वर्षांपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी अशी सभा आयोजित करण्यात येत आहे. यांत माहिती चर्चा, आढावा इत्यादी घेतला जातो. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी मागील दोन महिन्यांत घडलेल्या घडामोडींचा आढावा घेतला. त्यामध्ये त्यांनी राष्ट्रीय परिषद करिअर फेअर MSBTE या जाहीर झालेला निकाल परदेशी शिक्षण बुक बँक योजना, माजी विद्यार्थी इत्यादी मुद्द्यांवर भाष्य केले. शेवटी 'Simplicity' विषयी त्यांनी पॉवर पॉइन्टद्वारे सादरीकरण केले.

पुढील वर्षी 'Next Generation electronics' या १६ व्या राष्ट्रीय परिषदे विषयीची घोषणा आणि माहिती परिषदेच्या संघटन सचिव प्रा. सौ. अगाशे यांनी दिली. सभेचे आयोजन इलेक्ट्रीकल पावर सिस्टिम विभागाने केले होते.

**श्री. वामन कृष्णाजी विचारे सेवानिवृत्त**



तंत्रनिकेतनमधील श्री. वामन कृष्णाजी विचारे हे आपल्या २३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. श्री. विचारे हे नोव्हेंबर १९९१ पासून तंत्रनिकेतनच्या सेवेत प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून होते.

अत्यंत मनमिळाऊ कामसू होते. तंत्रनिकेतन आणि अशासकीय शिक्षकेतर महाविद्यालयीन कर्मचारी संघटना–तंत्रनिकेतन युनिट तर्फे त्यांना तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांचे शुभहस्ते शाल श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. प्रसंगी अनेक वक्त्यांनी श्री. विचारे यांच्या बद्दल भावना व्यक्त केल्या.

अशासकीय शिक्षकेतर महाविद्यालयीन कर्मचारी संघटना–तंत्रनिकेतन युनिटचे ते सदस्य होते. श्री. विचारे यांना पुढील आयुष्य आरोग्यदायी सुखासमाधानाचे लाभो हीच सदिच्छा!

**प्रकल्प प्रदर्शन**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनमधील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना 'ग्रुप प्रकल्प' प्रदर्शन तंत्रनिकेतनमध्ये भरविले होते. प्रदर्शन दि. २८ फेब्रुवारी होते.

तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना ग्रुप प्रकल्प तयार करावा लागतो. विद्यार्थ्यांनी अत्यंत मेहनतीने आणि नव–नवीन संकल्पना वापरून प्रकल्प तयार केले होते.

प्रदर्शनाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी, पालक आदींनी भेट दिली. नावीन्यपूर्ण कल्पना वापरून तयार केलेल्या प्रकल्पांचे कौतुक करण्यात येत होते.

**फॅक्ल्टी मिटिंग**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे आयोजित 'फॅक्ल्टी मिटिंग' दि. १ मार्च रोजी तंत्रनिकेतनच्या ए. व्ही. रूममध्ये झाली.

श्री. पी. बी. शिरसाटे यांचे 'मोटिव्हेशन' या विषयीचे प्रेझेंटेशन झाले. 'मोटिव्हेशन' संबंधीची उपयुक्त माहिती उपस्थितांना मिळाली. सदर मिटिंगसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.

(तंत्रनिकेतन वृत्त संकलन ग्रंथालय विभागातील **श्री. चंद्रकांत शिंगाडे** यांनी केले आहे.)

---

सौंदर्य डोळ्यांना आकर्षित करते, पण व्यक्तिमत्त्व हृदयात स्थान मिळवते.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### ‘दिग्वलय’ ( वार्षिक आंतर व्यवस्थापन शाळा स्पर्धा सोहळा) २२-२३ फेब्रुवारी

‘दिग्वलय’ या शब्दाचा द्वितीय तत्पुरुष समास होतो. दिशा - वलय असा विग्रह होतो. दिशः हा शब्द सापेक्ष दर्शक आहे. दिशा ज्ञान हे सूर्योदयाच्या आधारे केले जाते. परंतु जिथे पृथ्वी नाही तेथेही दिशांचे वलय हे असतेच. दाही दिशांचे अस्तित्व त्या ठिकाणी असतेच. दिग्वलय हे स्तुत्यपर विशेषण आहे. ‘दिग्वलयं जींत इति’ असेही विशेषण स्तुती करताना वापरले जाऊ शकते. विजीगिषु राजा प्रमाणे विजिगुषी पंडितही आपले बौद्धिक प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी यात्रा करीत. अशा बौद्धिक विजयाच्या बाबतीत वापरले जाणारे हे विशेषण. दिक् पलीकडील अवस्था म्हणजे दिग्वलय असा एक अर्थ आहे. स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ हे तीन लोक प्रसिद्ध आहेत. त्यांच्या जोडीला दिशांचा एक चौथा लोक जैमिनिय ब्राह्मणात (२.१७६) मानल्याचा उल्लेख आहे. या चारही लोकांना जिंकणारा ‘दिग्वलयी’ होय. अंतरिक्षस्थ विभूद्रव्य व सूर्यकिरण यांच्या संयोगाने दिशा उत्पन्न होतात असे कणाद रहस्यात विस्ताराने सांगितले आहे. दिशा ही एक शक्ती आहे. सृष्टीप्रवर्तनासाठी ज्या शक्ती प्रकट होतात त्यांपैकी ती एक आहे, असे भागवतात म्हटले आहे. (‘दिग्वलय’ समजण्यासाठी दिशा समजणे गरजेचे आहे.) दिशांच्या आधारामुळेच आपला व्यवहार यशस्वी होतो.

भारतातील विविध व्यवस्थापन शाळांमध्ये शिकणाऱ्या भावी व्यवस्थापकांसाठी / व्यावसायिकांसाठी व्यवस्थापन जगतातील विविध दिशा आणि परिमाणांचा शोध घेण्यासाठी एक बौद्धिक व्यासपीठ मिळवून देणे; या उद्देशाने, डॉ. व्ही . एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेच्या व्यवस्थापन विद्यार्थी संघातर्फे (MSA) ‘दिग्वलय २०१४’ नवीन नावाने या वर्षीच्या वार्षिक आंतर व्यवस्थापन शाळा स्पर्धा सोहोळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहोळ्यामध्ये विविध आव्हानात्मक स्पर्धांच्या मालिकांचे आयोजन करण्यात आले. त्यातून व्यवस्थापन जगताचे स्वामी, म्हणजेच ‘दिग्वलयी’ स्पर्धक निवडण्यात आले. संपूर्ण विश्वात पसरलेल्या दिशांवर स्वामित्व मिळवण्याची क्षमता असणारा असा तो ‘दिग्वलयी’. थोडक्यात उद्योग संस्थांचे जहाज नुसतेच चालवू शकणारेच / वाहून नेणारेच नव्हे तर भर वादळी लाटांवरून जाताना उद्योग संस्थांचे सुकाणू योग्य दिशेने वळवून संस्थेला तारून नेणारे असे दिग्वलयी शोधून काढणे, की ज्यांचा आदर आणि प्रतिष्ठा जगात सर्व दूर पसरेल.

या सोहोळ्याचा हेतू स्पर्धेच्या माध्यमातून केवळ प्रत्यक्ष अनुभवाचा प्रत्यय देणे नसून, अभिजात भारतीय व्यवस्थापन संस्कृतीच्या गुण वैशिष्टयांची जाण विद्यार्थ्यांना करून देणे हादेखील होता. म्हणूनच, सोहोळ्यातील स्पर्धा कार्यक्रमांना देखील व्यापार ज्ञान, व्यापार नीती, अर्थशास्त्र परिषद, भ्रमंती, चक्रव्यूह यांसारखी भारतीय नावे देण्यात आली होती. इतकेच नव्हे तर सोहोळ्याला भारतीय बाज देण्यासाठी सोहोळ्याच्या पहिल्या दिवशी सर्व सदस्य विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनीदेखील भारतीय पोशाख परिधान केले होते.

‘दिग्वलय २०१४’ चे उद्घाटन डॉ. अमित ओक (संचालक) आणि डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता) यांनी केले आणि अशा स्पर्धा वर्गात शिकलेल्या गोष्टी प्रत्यक्षात करून पाहण्याचा अनुभव घेण्याच्या दृष्टीने कशा महत्त्वाच्या आहेत यावर भर देत आपले मनोगत व्यक्त केले.

**'दिग्वलय २०१४' मध्ये खालील स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.**

- **शेर – ए – बझार** : – यामध्ये स्पर्धकांची गुंतवणुकीसंदर्भातील निर्णयक्षमता जोखण्यात आली.
- **व्यापार ज्ञान** :– जागतिक व्यापार क्षेत्रातील ताज्या घडामोडी, त्या संबधीची माहिती, तसेच एकंदरित व्यवसाय व्यवस्थापन संबधी प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली.
- **अर्थशास्त्रीय परिषद** :– "Rise of the Indian in the Global Business Arena" या विषयावर गट चर्चा आणि वादविवाद स्पर्धा घेण्यात आली .
- **व्यापार नीती** :– व्यापार योजना (Business Plan) तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली.
- **विज्ञापन – ओ – नीती** :– स्पर्धकांना आपापली सर्जनशीलता वापरून मजेशीर जाहिरात बनविण्याचे आव्हान देण्यात आले.
- **भ्रमंती** :– स्पर्धकांना भारतातील दुर्लक्षित किंवा अनभिज्ञ अशी प्रेक्षणीय स्थळे शोधण्याचे आव्हान होते, की जी पुढे उत्कृष्ट पर्यटन क्षेत्रे म्हणून प्रसिद्ध केली जाऊ शकतील.
- **चक्रव्यूह** :– अनुभवात्मक शिक्षण देणाऱ्या विविध व्यवस्थापन खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या.
- **क्रीडा स्पर्धा** :– खेळामधून नेतृत्व गुण, संघ भावना, संघ कार्य, प्रोत्साहन, तंटा निवारण यांसारख्या अनेक गोष्टी शिकता येतात; म्हणूनच क्रिकेट, टेबल टेनिस, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या स्पर्धादेखील आयोजित करण्यात आल्या.

मुंबई आणि नवी मुंबई परिसरातील व्यवस्थापन शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'दिग्वलय'मध्ये सहभाग घेतला. शहा आणि अंकर महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मिळाला.

●●●

## *निवडणूक : विचारार्थ काही नोंदी*

- 'नोटा'चा अधिकार मोठ्या संघर्षानंतर मतदारांना मिळाला आहे. आता लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचाही अधिकार असाच मिळायला हवा. तो फार आवश्यक आहे. निवडणूक; मग ती कुठलीही असो, तिच्यामुळं जनतेचं भाग्य उजळायला हवं. निवडणुकीनं सर्वसामान्य जनतेचं भलं केलं पाहिजे. उमेदवाराच्या नव्हे, तर जनतेच्या भाग्याचा फैसला निवडणुकीमधून व्हायला हवा...
- संसदेतल्या राज्यसभा या विद्वत् सभागृहाचे निम्म्यापेक्षा अधिक सभासद आज उद्योगपती अथवा वेगवेगळ्या उद्योगांशी संबंधित आहेत. लोकसभा, विधानसभा तर सोडाच, पण छोट्या गावातील साधी ग्रामपंचायतीचीही निवडणूक सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या आवाक्याबाहेर गेली आहे.

**– संकलित**

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# जाहीर आवाहन

➢ **विद्या प्रसारक मंडळ :–** विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली ७८ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. १९३२ साली सुरू झालेल्या नौपाड्यातील एका प्राथमिक शाळेच्या वाढीसाठी मंडळाने १९३५ पासून कार्याला सुरूवात केली. स्वतःच्या मालकीची जागा शाळेसाठी संपादन करून शाळेचे रूपांतर माध्यमिक शाळेत केले. इंग्रजी माध्यमाची शाळाही १९७६ पासून मंडळ चालवित आहे. १९६९ मध्ये ठाण्यात पहिले महाविद्यालय स्थापन झाले. कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी या विभागांसाठी स्वतंत्र महाविद्यालये, तांत्रिक शिक्षणासाठी तंत्रनिकेतन व व्यवस्थापन शिक्षणासाठी व्यवस्थापन संस्था चालू केल्या. वरील शैक्षणक विभागांतर्फे अनेक अभ्यासक्रम राबवले जातात. वरील सर्व शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारतीची सोय केली आहे. वरील सर्व शैक्षणिक विभागांत आज मितीस सुमारे १७००० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. मंडळाने २०१२ पासून नविन आधुनिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय कोकणात सुरु केले आहे.

➢ **मंडळाची शैक्षणिक प्रसारासाठी कोकण परिसराची निवड** : एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजुला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत आहे. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत आहे.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांचे साक्षरतेचे प्रमाण चांगले आहे तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मिळत असलेल्या कमी संधींमुळे विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर या विषयावर सर्वेक्षण करुन आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागात आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण झाली पाहिजेत असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्हांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागरी जिल्ह्यांची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात कमी म्हणजेच फक्त ८ टक्के आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागात आहेत. याचे मुख्यकारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शंहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामूळे गरजू व हूशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोयतर होईल, पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्वही वाढेल.

➢ **विद्या प्रसारक मंडळाच्या नविन प्रकल्पाविषयी :–** मंडळाच्या शाळा व महाविद्यालयीन शैक्षणिक अभ्यासक्रमांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने व कोकण परिसरासाठी उत्तम शैक्षणिक संस्थांची गरज लक्षात घेऊन संस्थेने आता आपले शैक्षणिक उपक्रम कोकणात राबवण्याचे ठरवले असून त्यादृष्टीने गुहागर जवळील वेळणेश्वर येथे सुमारे ६० एकर जागा घेतली असून त्याचा पहिला टप्पा ३५ एकर जागेमध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे. या अभियांत्रिकी महाविद्यालयास विद्या प्रसारक मंडळाचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय असे नामकरण करण्यात आलेले आहे. सदर महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, दिल्ली आणि तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांची मान्यता मिळाली असून मुंबई विद्यापीठाची संलग्नताही प्राप्त झाली आहे. दिनांक ६–८–२०१२ रोजी महाविद्यालयाचा उद्घाटन समारंभ पार पडला. व त्या दिवसापासून शैक्षणिक वर्ष २०१२–२०१३

ची सुरुवात झाली. या महाविद्यालयामध्ये मॅकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलकम्युनिकेशन, कॉम्प्युटर व सिव्हिल या सहा अभियांत्रकी पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम व द्वितीय वर्ष मिळून ३२६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून महाविद्यालय नियमितपणे सुरु आहे.

या महाविद्यालयाच्या संकुलामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ६ शैक्षणिक इमारती, १० वसतीगृहे, १० शिक्षकनिवासस्थाने, २ अतिथी गृह, संस्था कार्यालय/सभागृह/उपहारगृह, बँक/टपाल कार्यालय/स्टेशनरी दुकान/केश कर्तनालय/दवाखाना अशी एक बहुउद्देशीय इमारत, आधुनिक व्यायामशाळा/बॅडमिंटन कक्ष/ बंधस्त खेळागृह, विद्युत पुरवठा इमारत (Sub-Station), केंद्रीय संगणक नियोजन इमारत (सर्व्हर रुम), मल:नित्सारण प्रक्रिया केंद्र (STP), ९ लाख लिटरची भुमिगत व ५ लाख लिटरची जमीनीवरील टाकी, प्रवेशद्वार व देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एक इमारत अशा सुमारे ३७ इमारतींचे ६,००,००० चौ. फुट क्षेत्रफळाचे बांधकामाचा कल्पकतने केलेला मंजूर आराखडा आहे. संपूर्ण ३५ एकरचा परिसर अनेक शोभवंत झाडे व हिरवळीने सुशोभित करण्यात येत आहे. हा सर्व परिसर काचतंतु (Fibre-Optic) च्या जाळ्याने जोडलेला असून बिनतारी (WiFi) प्रक्षेपण ३५ एकरात उपलब्ध असेल. या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व सोयी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असून याचे उद्दिष्ट उत्कृष्ट गुणवत्ता हाच आहे.

मंजूर आराखड्यापैकी पहिल्या टप्प्यातील २१ इमारतींचे बांधकाम हाती घेतले आहे व त्यातील १८ इमारतींचे बांधकाम १०० टक्के पूर्ण झाले आहे व तिन इमारतींचे बांधकाम जुन २०१४ अखेर पूर्ण करावयाचे आहे व उर्वरीत इमारतीचे बांधकाम निधी उपलब्धतेवरच करण्याचे ठरवले आहे.

➢ **देणगी व मूदत ठेवीसाठी आवाहन** : हे अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याकरता दोन टप्प्यातील बांधकामे, रस्ते, शैक्षणिक साधने, संगणक व तत्सम सुविधा, पुस्तके, वैज्ञानिक साधन सामुग्री, फर्निचर, सौरउर्जा साधने व इतर सोयी सुविधा इत्यदीं वरती १५० कोटी खर्च अपेक्षित असून आजपर्यंत जवळपास ७० कोटी रुपये खर्चाचे बांधकाम झाले आहे. एकूण झालेल्या खर्चापैकी ४४ कोटी बँकेकडून कर्ज घेऊन केले आहे तर उर्वरीत २६ कोटी मंडळाच्या उत्पन्नातून व लोकांकडून स्विकारलेल्या वैयक्तिक ठेवीतून खर्च केले आहेत. बँकेकडून अजून कर्ज मिळणे अशक्य असल्यामुळे राहिलेले पहिल्या टप्प्यातील काम करण्यासाठी अंदाजे १० कोटी खर्चाची तरतूद मंडळालाच करावयास लागणार आहे. मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरुपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु.१० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वरुपात निधी गोळा करण्याकरता धर्मादाय आयुक्तांकडून रितसर परवानगी घेतली आहे.

**अटी**

१. संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीत कमी रू. ५,०००/- वा त्याच्या पटीत स्विकारण्यात येतील.

२. सदर ठेवीचा कालावधी १० वर्षांचा असेल व किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३. ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४. ठेवीच्या कालावधीत ठेवीधारकाचा मृत्यु ओढवल्यास वारसधारकास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५. सदर ठेवीवर दर साल दर शेकडा ५% किंवा राष्ट्रीयकृत बँकांच्या प्रचलित व्याजदरांना समांतरीत अशा सरळ व्याजदराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल

६. काही अपरिहार्य कारणामुळे १० वर्षाच्या मुदतीपूर्वी ठेव मोडण्याचे असल्यास ठेवीदाराने तीन महिन्याची आगाऊ सुचना देणे आवश्यक असेल व ती सहा महिन्यांच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरुपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीयस्वप्न पूर्तीस हातभार लावावा.

अधिक महितीकरता या अभियांत्रकी महाविद्यालयाच्या www.vpmmpcoe.org या संकेतस्थळावर भेट द्यावी.

आपला विश्वासू,

**डॉ. विजय वासुदेव बेडेकर**
कार्याध्यक्ष,
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

भास्कर ९००

# विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०

*भारतातील महान गणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.*

*अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ.स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवत त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले, ज्याचा येणाऱ्या शतकांतील विषयांच्या विकासावर प्रभाव पाहावयास मिळतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.*

# भास्कर ९००

## आंतरराष्ट्रिय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

**शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४**

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत – ४०० ६०१

**http://www.vpmthane.org/bhaskara900/**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❋ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
❋ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
❋ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.